दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

# चांगल्या अधिकऱ्यांचे निलंबन?

## दखल:मोतीबिंदू शस्त्रक्रियेत बीड जिल्हा पहिला




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ आशोक थोरात यांचे निलंबन आमदारा नमीता मुंदडा यांनी जातीचे,सुडाचे राजकारणाच्या द्वेशा पोटी केले परंतु आमदारा नमीता मुंदडा फक्त नावालाच आमदार आहेत कारभार आमदारा सासरे नंदकिशोर मुंदडा करतात व नंदकिशोर मुंदडा यांच्या सांगण्यावरून डॉ आशोक थोरात यांचे निलंबन करण्यात आले परंतु आमदारा नमीता मुंदडा यांनी सुरक्षित आहेत त्यांनी कुणाच्याही सांगण्यावरून डॉ आशोक थोरात यांचे निलंबन करायला नव्हते पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे परंतु त्यांचे कार्य बघुन जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगुन निलंबनाची कारवाई करायला नव्हती पाहिजे असे चर्चा नागरिकांन मध्ये सुरू झाले तरी बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात आणि त्यांच्या टीमने घेतलेल्या मेहनतीचे फळ मिळाले असुन सार्वजनिक आरोग्य विभागात उत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांमध्ये बीडचा समावेश झाला आहे.

राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमात बीड जिल्ह्याने उत्तम कामगिरी बजावली असुन मोतीबिंदू शस्त्रक्रियेत बीड जिल्हा पहिला आला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे सहसंचालक डॉ. गोविंद चौधरी यांनी जागतिक आरोग्य दिनानिमित्त ७ एप्रिल २०२५ रोजी येथे पुरस्कार सोहळ्याकरीता उपस्थित राहणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची माहिती मागवली आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रियेत बीड जिल्हा पहिला आला असुन एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत बीड जिल्ह्याला ६ हजार २५१ मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा उध्दीष्ट देण्यात पान २ वर

# कर्जमाफीच्या पैशांचे काय करता?:

## कर्जमाफीबद्दल विचारताच कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांनाच सुनावले

पुण्यभूमी प्रतिनिधी



नाशिक ;कर्जमाफीच्या मुद्द्यावरून कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांनाच सुनावले. माणिकराव कोकाटे आज नाशिकमध्ये अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या भागाची पाहणी करत आढावा घेत होते. यावेळी शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे कर्जमाफीचा विषय काढला. त्यावर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कर्जमाफी मिळाल्यानंतर त्या पैशांचे काय करता? शेतीमध्ये गुंतवणूक करता का? असा सवाल केला. तसेच कर्जमाफीच्या पैशातून लग्न, साखरपुडा करता, असेही ते म्हणाले.

अवकाळी पावसामुळे नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आज दिवसभर नाशिक शहरात होते, पक्षाची बैठक आणि इतर बैठकीमुळे त्यांना अवकाळी भागाचा दौरा करण्यासाठी उशीर झाला. यावेळी शेतकऱ्यांनी माणिकराव कोकाटे यांना शेतकरी कर्जमाफीबाबत विचारणा केली असता त्यांनी उलट शेतकऱ्यांनाच सुनावले.

माणिकराव कोकाटे शेतकऱ्यांना बांधावर आले असता, अजितदादा बोलले की कर्जमाफी होणार नाही, नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळेल का? असा प्रश्न शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांना केला. शेतकऱ्याच्या या प्रश्नाचे उत्तर देताना माणिकराव कोकाटे यांनी जे नियमितपणे कर्ज भरतात त्यांनी भरावे, असा सल्ला दिला. कर्ज घ्यायचे आणि पाच ते दहा वर्ष कर्जमाफी होण्याची वाट पाहायची. तोपर्यंत काही भरायचे नाही. समोर मीडिया उभी आहे. त्यामुळे मीडियासमोर मी जास्त बोलत नाही. पण मला एक सांगा, कर्जमाफी झाल्यानंतर तुम्हाला पैसे येतात. त्या पैशांचे तुम्ही काय करता? त्या पान २ वर



बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

प्रियदर्शी राजा अशोक सम्राट
जयंती निमित्ताने
विनम्र अभिवादन

# गुरूजींविषयी अशीही कृतज्ञता!

## पंकजा मुंडे: सन्मानाने नानेकर गुरूजी भारावले



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे शालेय शिक्षण शहरातच झाले, हे सर्वांनाच ज्ञात आहे. मंत्री झाल्यानंतरही त्यांची नाळ सर्व सामान्य जनतेप्रमाणेच शाळेतील त्यांच्या शिक्षकांशी आजही कशी जोडली गेली आहे, याचा प्रत्यय आज येथे आला.

सरस्वती विद्यालयातील सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक सुभाषराव नानेकर हे ना. पंकजाताईंचे शिक्षक.. त्यांचा नुकताच अमृत महोत्सव सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला ना. पंकजाताई उपस्थित राहू शकल्या नव्हत्या, पण त्यांनी दूरध्वनीवरून त्यांना शुभेच्छा दिल्या होत्या. गुरूजींच्या कार्यक्रमाला आपण नव्हतो ही चुटपूट त्यांच्या मनाला लागली होती त्यामुळे आज शहरातच असल्याने अगदी आठवणीने त्या नानेकर गुरूजींच्या घरी गेल्या आणि त्यांचा सहकुटुंब हृदयसत्कार केला, त्यांच्या दीर्घायुष्याची कामना केली, शुभेच्छा दिल्या व छान गप्पाही मारल्या. मंत्री असूनही गुरू-शिष्याचे नाते जपत पंकजाताईंनी जी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली, ते पाहून नानेकर गुरूजी भारावून गेले. यावेळी त्यांचा मित्र परिवार देखील उपस्थित होता. ना.पंकजाताई मुंडे यांनी शालेय जीवनातील अनेक आठवणींना यावेळी उजाळा दिला. नानेकर गुरुजींनी देखील लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब आणि पंकजाताई मुंडे यांच्या आठवणी सांगितल्या आणि आपल्या विद्यार्थीनीची प्रगती बघून समाधान व्यक्त केले.

# तुलसी शैक्षणिक समूहातून गुणवत्ता सिद्ध

## पप्पू कागदे:रिपाइं कार्यालयात प्रा.प्रदिप रोडेंचा सत्कार



बीड/प्रतिनिधी

अतिशय खडतर संघर्षातून तुलसी शैक्षणिक समूह उभा राहिला.त्यामुळेच गुणवत्ता सिद्ध होवून शिक्षणाचा वटवृक्ष विस्तीर्ण होतो आहे.म्हणून तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा.प्रदिप रोडे यांच्या कार्याची देशातील टॉप असलेल्या वृत्तपत्राने दखल घेतली असून हाँगकाँग येथे त्यांना ग्लोबल कन्वेक्शन कमिट हा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.

बीड येथील रिपाइं मध्यवर्ती कार्यालयात नुकताच प्रा. प्रदिप रोडे यांचा सत्कार समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला.त्यावेळी पप्पू कागदे बोलत होते.यावेळी राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, अक्षय कोकाटे, अक्षय वडमारे, धम्मा पारवे, भास्कर जावळे, महेंद्र वडमारे, बापूसाहेब पवार आदी उपस्थित होते. यावेळी पप्पू कागदे म्हणाले की, तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा.प्रदिप रोडे यांचे, धम्मकार्याबरोबरच समाजकारणातही मोठे योगदान आहे. बीडमध्ये दूरदृष्टी कोणातून शैक्षणिक हब त्यांनी निर्माण केले आहे. त्यांच्या महाविद्यालयातून एक सुसंस्कारित पिढी घडत आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना उद्योग, व्यवसाय भाषांचे महत्त्व या विषयावर सातत्याने मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या जीवनामध्ये पान २ वर

आदित्य सारडा | बँकेला ७ कोटी ७५ लाखाचा नफा

# व्दारकादास मंत्री बँक आली पूर्वपदावर

पुण्यभूमी प्रतिनिधी






बीड:येथील व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची गतवर्षी रिझर्व बँकेच्या निर्बंधातून मुक्तता झाल्यानंतर ३१ मार्च २०२५ अखेर बँकेची आर्थिक परिस्थिती उत्तम झाली आहे. बँक पूर्ववैभवा कडे वेगाने वाटचाल करत आहे. बँकेला चालू वर्षात ७ कोटी ७५ लाख रूपयांचा नफा झाला असून रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे सी.आर. ए. आर. ९ टक्के असल्यास बँक उत्तम असल्याचे मानते तो बँकेकडे आज ६४.४२ टक्के सी.आर.ए.आर. आहे. बँकेचे नेटवर्थ हे सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढले असून मार्च २०२५ अखेर बँकेचे नेटवर्थ २५ कोटी ७ लाख रूपये झाले असून बँक पूर्वपदावर येत असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांनी दिली.

व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेच्या सभासद बैठकीत अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, बँकेची चौफेर प्रगती होत आहे. आवश्यक त्या तरतुदी बँकेने केल्या आहेत. बँकेकडे आज ६३ कोटी ६३ लाख इतक्या ठेवी आहेत. बँकेने दिलेले कर्ज हे रु.७९ कोटी ८२ लाख आहे. तर बँकेकडे राखीव व इतर निधी ४८ कोटी ९८ लाख रूपये इतका आहे. बुडीत संशयित निधीमध्ये ५३ कोटी ५५ लाख रूपये आहे आणि बँकेचे भाग भांडवल हे २०.०१ कोटी आहे. बँकेची शासकीय रोखे व इतर बँकेतील गुंतवणूक ६३ कोटी ४७ लाख रूपये इतकी आहे. रोख व बँक शिल्लक १७ कोटी ७७ लाख रूपये आहे. अशी बँकेकडे पान २ वर

व्दारकादास मंत्री बँक ही भारतातील एकमेव बँक असून याची दाखल केंद्र शासनाचे सहकार मंत्रालयाने सहकारी बँकिंग क्षेत्राचे परिवर्तनासाठी शासनास सल्ला देणे साठी नियुक्त केलेल्या टास्क फोर्सने घेतली व व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेने निर्बंध उठण्यासाठी केलेल्या कामाचा आढावा घेवून त्याचा आदर्श भारतातील निर्बंध लागलेल्या सहकारी बँकांना देवून त्या बँका निर्बंधमुक्त होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केले. द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेचे व्यवहार आता पूर्ववत सुरु झाले असून कर्ज वाटपासाठी बँकेकडे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. त्यामुळे ज्यांना स्वतःची आर्थिक घडी बसवण्यासाठी कर्जाची आवश्यकता आहे. त्यांनी बँकेकडे संपर्क साधून आवश्यक असलेले कर्ज घ्यावे.

-डॉ.आदित्य सारडा,
अध्यक्ष व्दारकादास मंत्री बँक

# सोलार कंपनीकडून काम होतेय निकृष्ट?

## मागणी:केज तहसीलदारांनी कारवाई करावी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथील गायरान जमीनीवर सोलर कंपनीवाल्यानी मागिल काही महीण्यापासुन काम सुरू केले आहे मात्र आणखी सुध्दा काम काम प्रगतीपथावर सुरू नाही तसेच काम भोगस करण्यात येत आहे व संमधीत कामाच्या अधिकाऱ्यांना कामा संदर्भात बोलायची सोय राहिली नाही कारण संमंधीत अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहे मग तहसीलदार साहेब चिंचोली माळी येथील सोलार कंपनीचे काम निकृष्ट दर्जाचे होऊ देनार का असा प्रश्न नागरिकांना पान २ वर

## ‘वक्फ’ने किया

लोकसभेत ‘वक्फ’ विधेयक मंजूर झाले. ते होणारच होते. एक तर विद्यामान सत्ताधीशांस ‘मियाँ की तोडी’ या रागाची असलेली असोशी आणि दुसरी बाब म्हणजे तो राग आळवण्याच्या त्यांच्या कौशल्यावर फिदा झालेले बहुसंख्य. या दोन्ही बाबी लक्षात घेतल्यास वक्फ विधेयक ही सत्ताधीशांची भावनिक गरज का ते कळेल. वास्तविक देशाच्या अर्थव्यवस्थेवर दीर्घकाल परिणाम करणारे अमेरिकेचे नवे आयात कर प्रत्यक्षात येण्यास अवघे २४ तास उरलेले असताना या गंभीर विषयावर मंथन करण्याची, संभाव्य उपाययोजनांची आणि देशवासीयांस त्याची माहिती देण्याची आवश्यकता सरकारला वाटत नसेल आणि त्याबद्दल नागरिकांसही काही कमी–अधिक जाणवत नसेल तर बौद्धिकतेच्या कोणत्या इयत्तेत आपण अडकलेले आहोत याची जाणीव व्हावी. इतके आर्थिक संकट डोक्यावर घोंघावत असताना काही तरी क्रांतिकारी केल्याच्या अभिनिवेशात सत्ताधारी वक्फ नियमन आणतात आणि त्यामुळे जणू आकाश कोसळणार असल्याच्या थाटात विरोधक त्याविरोधात कंठशोष करतात या दोनही बाबी तितक्याच हास्यास्पद. मुसलमान महिलांस समानता देण्यासाठी, सामाजिक संपत्ती नियमनासाठी आपण या सुधारणा आणत असल्याचा कितीही मोठा दावा सरकारने केला तरी या विधेयकामागील खरे कारण लपून राहणारे नाही. तसेच या विधेयकामुळे अल्पसंख्याकांवर अन्याय होत असल्याचा कितीही मोठा टाहो विरोधी पक्षीयांनी फोडला तरी बहुसंख्यास पाझर फुटणार नाही. तेव्हा आक्रस्ताळ्या परस्परविरोधी भूमिका चार हात लांब ठेवून या विधेयकावर भाष्य आवश्यक.वक्फ’ याचा अर्थ इस्लाम धर्मीयांनी आपल्या संपत्तीतील काही वाटा परमार्थासाठी अल्लाच्या नावे दान करणे. ते रोख किंवा स्थावर/जंगम मालमत्तेच्या रूपातही करता येते. एकदा का अल्लाच्या नावे हे दान दिले गेले की अन्य कोणास देणगी, वारसा इत्यादी मार्गांनी त्यावर अधिकार राहात नाही. ही परंपरा शेकडो वर्षांची. त्यातूनच देशभरात वक्फच्या नावे मालमत्ता उभ्या राहिल्या आणि वक्फ मंडळाकडे भरभक्कम रोकडही जमा होत गेली. धर्मसुधारणा प्रत्यक्षात आल्या त्या हिंदू धर्मातील धर्मवेड पाहता अशा सुधारणांचा वारा न लागलेल्या इस्लाम धर्मीयांत ते किती असेल याचा अंदाज येईल. तेव्हा सामान्य मुसलमान उत्तरोत्तर कफल्लक, रोजगारहीन होत असताना वक्फ मंडळे मात्र उत्तरोत्तर धनवान होत गेली यात काही आश्चर्य नाही. धर्म कोणताही असो. त्यास एकदा साचलेपण आले, संपत्तीनिर्मिती आली की पाठोपाठ गैरव्यवहारही आलेच. वक्फ मंडळातही तेच झाले. आज सरकारने हे विधेयक आणले म्हणून कंठशोष करणाऱ्या किती जणांनी वक्फने आपल्याकडील जमीन अंबानींच्या २७ मजली इमल्यासाठी उपलब्ध करून दिली तेव्हा त्यास रोखले? वा किमान रोखण्याचा प्रयत्न केला? हे उदाहरण अशासाठी दिले की पैसा, संपत्ती, जमीन–जुमला यांचा जेव्हा विषय येतो तेव्हा गैरव्यवहारांच्या मुद्द्यावर सर्वधर्मसमभाव डोळ्यात भरण्याइतका उठून दिसतो. तेव्हा या जमिनींवरील नियंत्रणाच्या हेतूने सरकारने वक्फ सुधारणा विधेयक आणले यातून सर्व सत्ताकेंद्रे आपल्या हाती ठेवण्याचा विद्यामान सत्ताधीशांचा दृष्टिकोन तेवढा दिसतो. हे विधेयक इस्लाम धर्मात हस्तक्षेप करणारे निश्चित नाही. मात्र ते इस्लाम धर्मीयांच्या संपत्ती व्यवस्थापनात ढवळाढवळ करते हे मात्र तितकेच निश्चित. असे असेल तर या विधेयकास इस्लाम धर्मीयांचा विरोध का? या सरकारचा अन्य धर्मीयांबद्दलचा दृष्टिकोन, त्याचा इतिहास हे या प्रश्नाचे उत्तर. हे वास्तव लक्षात घेता उभय बाजूंचा अभिनिवेश टाळून या विधेयकाचा ऊहापोह आवश्यक. वक्फ ही इस्लाम धर्मीयांची इस्लाम धर्मीयांसाठीची यंत्रणा असल्याचे स्पष्ट आहेच. पण तशी ती असली तरीही देशातील विद्यामान कायदे तीस लागू नाहीत असे अजिबात नाही. वक्फच्या संपत्ती हाताळणी वा अन्य व्यवहारांवर इतिहासात कित्येकदा कज्ञेदलाली झालेली आहे आणि अनेक उच्च न्यायालयांनी वक्फविरोधात निर्णय दिलेले आहेत. इतकेच नव्हे; गरज पडल्यास वक्फ मंडळ विसर्जित करून प्रशासकाहाती त्याचा कारभार सोपवण्याची वैधानिक सोय आताही आहेच. म्हणजेच विद्यामान कायदे वक्फ नियमनास पुरेसे आहेत. पण तरीही नव्या कायद्याची गरज वाटते यामागील हेतू निःसंशय राजकीय. तो इतका उघड दिसतो की सरकार वक्फचे नावही बदलू पाहते. या सरकारला लघुरूपांचे अनावर व्यसन आहे. त्याचेच दर्शन वक्फच्या नव्या ‘उम्मीद’ (युनिफाइड वक्फ मॅनेजमेंट, एम्पॉवरमेंट, एफिशियन्सी ॲण्ड डेव्हलपमेंट) या नावातही दिसते. भारतीय दंड संहितेच्या जागी न्याय संहिता, नियोजन आयोगाएवजी निती आयोग इत्यादी नामांतरासारखेच हे. तितकेच निरर्थक आणि हास्यास्पद. असो. या नव्या कायद्यात इस्लामेतर व्यक्ती वक्फचे नियमन करू शकतात किंवा काय याबाबत मतभेद आहेत. विरोधकांचा तसा आरोप गृहमंत्री अमित शहा यांनी फ टाळला. तथापि या मुद्द्याची वादग्रस्तता नाकारता येणारी नाही. याबाबतचा साधा प्रश्न असा की उद्या तिरुपती येथील बालाजीच्या वा केदारनाथ वा अन्य कोणत्याही हिंदू मंदिरांच्या व्यवस्थापनांत अन्य धर्मीयांना असाच सहभाग दिला जाईल किंवा काय? हा मुद्दा फक्त हिंदूंनाच लागू होतो असे नाही. पारशी वा ख्रिश्चन धर्मीयांचे काय? त्यांच्या संस्थांतही असाच अधिकार दिला जाणार का? विद्यामान व्यवस्थेतही वक्फ मंडळाचे सदस्य हे सरकारनियुक्तच असतात. सध्या उपसचिव दर्जाचा अधिकारी याचे नियमन करतो. नव्या कायद्याने ही जबाबदारी सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याकडे दिली जाईल. तेव्हा या नव्या बदलाने नेमके नवे काय होणार?नव्या कायद्याबाबत खरी आक्षेपार्ह बाब आहे ती बिगर–मुसलमान व्यक्तीस वक्फसाठी देणगी आदी देण्यास प्रतिबंध ही. तो का? एखादा मुसलमान वा ख्रिश्चन वा पारशी वा बौद्ध जर हिंदू धर्मीय संस्थांस काही देऊ शकत असेल तर ही मुभा इस्लाम धर्मीयांच्या संस्थेला नाही.

# कळंब येथे हनुमान जन्मोत्सव

## आध्यात्मिक:अखंड हरिनाम सप्ताह



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सप्ताहाचा प्रारंभ ५ एप्रिल शनिवार व सांगता १२ एप्रिल शनिवार रोजी होत आहे या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, महिला भजन, प्रवचन, हरिपाठ, हरी किर्तन, हरिजागर असे कार्यक्रम संपन्न होत असून नामवंत कीर्तनकाराची कीर्तन सेवा होणार आहे, यामध्ये ह.

भ. प. ज्ञानेश्वर महाराज बोराडे गोटेगांव, ह .भ. प .गणेश महाराज सोनवणे आळंदी देवाची, भागवताचार्य किशोर महाराज मुकुंदराज, ह .भ .प. भगवान महाराज वरपगांव, ह.भ. प. संतोष महाराज पानसे पांगरीकर , ह. भ .प. दत्तात्रय महाराज आंबीरकर डिकसळ, ह. भ. प. नारायण भाऊ महाराज उत्तरेश्वर पिंपरी, प्रवचन सेवा ह.भ.प. शिंदे गुरुजी महाराज, ह भ प सदाशिव महाराज शिंदे, ह .भ .प .बळीराम महाराज कवडे ह .भ. प .घनश्याम महाराज रामणाचार्य ह. भ .प. महेश महाराज भोरे ,ह. भ. प. कुलदीप महाराज शितोळे ,डॉ, सुजित महाराज झाडगे यांची आहे दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता हनुमान जयंतीनिमित्त हनुमान जन्मोत्सव संपन्न होत आहे तर दुपारी ४ ते ६ या वेळेत ज्ञानेश्वरी ग्रंथ भागवत ग्रंथ व तुकाराम महाराज गाथा यांची भव्य दिव्य मिरवणूक दिंडी प्रदक्षिणा होणार असून महिला दिंडीचे नेतृत्व मीराताई चोंदे व सर्व महिला भजन मंडळ हे करतील ज्ञानेश्वरी वाचक ह .भ .प. ज्ञानेश्वर महाराज आंबीरकर डिकसळ, सर्व पूजा पुरोहित बंडोपंत जोशी, दिनांक १२ एप्रिल शनिवार रोजी सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन सेवा ह. भ. प. ज्ञानसिंधू संदिपान महाराज शिंदे– पाटील अध्यक्ष व परीक्षक जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदी यांची आहे तर शिवाजी आप्पा कापसे माजी नगराध्यक्ष यांचा महाप्रसाद होईल या सप्ताहासाठी कीर्तन मंडपातील नियोजन ह.भ. प. आबासाहेब शिंदे गुरुजी, चत्रभुज आप्पा चोंदे, मुरलीधर चोंदे, पांडुरंग माळवदे व दक्षिणमुखी हनुमान भजनी मंडळ यांच्याकडे आहे .



# केवडमध्ये कीर्तन सेवा उत्साहात

## आध्यात्मिक:ज्ञानदेव काशिद यांचे कीर्तन

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील केवड येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह तिसऱ्या दिवसाची सेवा शिवचरित्रकार, प्रबोधनकार, प्रेरणादायी वक्ते, समाजसेवक ह.भ.प. मा.श्री.ज्ञानदेव काशीद यांच्या किर्तनरुपी सेवा काल दि.२ एप्रिल २०२५ रोजी संपन्न झाली.केवड येथील सर्व भावी भक्तांनी शिवचरित्र किर्तनरुपी सेवेचा अस्वाद आनंदाने घेतला यावेळी गावातील भावि भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शिवचरित्रकार ज्ञानेदेवजी काशिद यांच्या बद्दल थोडी माहिती सांगायची झाली तर शिवचरित्रकार ज्ञानेदेवजी काशिद यांनी मागिल दोन वर्षांपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या लढाईत मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत कायमस्वरूपी काम करत आहेत त्यांनी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांचे खंदे समर्थक म्हटले तरी चालेल किंवा अहोरात्र मराठा सेवक म्हणून काम करनारे शिवचरित्रकार ज्ञानेदेवजी काशिद यांनी केवड येथे शिवचरित्र किर्तनरुपी सेवेचा अर्शिवाद दिला व त्यांनी सांगितले की आपल्या जातीचा अभिमान प्रत्येकाने बाळगला पाहिजे असे त्यांनी बोलताना म्हटले आहे.

## पान एक वरून

**चांगल्या अधिकाऱ्यांचे निलंबन?**

आले होते. त्यापैकी ६ हजार १३२ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. दिलेल्या उध्दीष्टापैकी ९८.१% उध्दीष्ट पुर्ण करत बीड जिल्ह्याने राज्यात उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. जागतिक आरोग्य दिनी दि.७ एप्रिल २०२५ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय कार्यक्रमात मोतीबिंदू शस्त्रक्रियेत उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल बीड जिल्हा रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात आणि पुर्ण टीमचा सन्मान करण्यात येणार आहे.

**कर्जमाफीच्या पैशांचे काय**

पैशांतून शेतीमध्ये एक रुपयाची तरी गुंतवणूक आहे का? असा सवाल माणिकराव कोकाटे यांनी केला. आता सरकार तुम्हाला (शेतकऱ्यांना) शेतीमध्ये गुंतवण्यासाठी पैसे देणार आहे. तुम्हाला पाईपलाईनाला पैसे आहेत. सिंचनासाठी पैसे आहेत. तुम्हाला शेततळ्यासाठी पैसे आहेत. सरकार भांडवली गुंतवणूक करते. भांडवली गुंतवणूक शेतकरी करतात का? शेतकरी म्हणतात की, पीक विम्याचे पैसे पाहिजेत. मग त्यातून साखरपुडे करा, लग्न करा, असे विधान कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले.दरम्यान, काही दिवसांपूर्वी शेतकरी कर्जमाफी हा माझा विषय नाही. याबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री निर्णय घेतील, असे माणिकराव कोकाटे यांनी काही दिवसांपूर्वी म्हटले होते. तर याआधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नसून शेतकऱ्यांनी पीककर्ज भरावे, असे आवाहन अजित पवार यांनी केले होते. माणिकराव कोकाटे यांनी काही दिवसांपूर्वी देखील शेतकऱ्यांबाबत वादग्रस्त विधान केले होते. हल्ली भिकारी देखील एक रुपया घेत नाही. आम्ही शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजना लागू केली, असे कोकाटे म्हणाले होते. ही योजना चांगली आहे. त्यामुळे या योजनेला चांगला प्रतिसाद देखील मिळाला. पण, या योजनेलाही गैरव्यवहाराचे ग्रहण लागले, असेही कोकाटे म्हणाले होते. माणिकराव कोकाटे यांच्या या वक्तव्यानंतर त्यांच्यावर शेतकऱ्यांसह विरोधकांनी जोरदार टीका केली होती.

**तुलसी शैक्षणिक समूहातून**

यशस्वी होऊ लागले आहेत. आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या कार्यालयात प्रा. प्रदीप रोडे यांना हॉंगकॉंग येथे मिळालेल्या ग्लोबल कन्वेक्शन कमिट सन्मानाबद्दल सत्कार संपन्न होतो आहे. समाजातल्या व्यक्तीचा एवढ्या मोठ्या ठिकाणी गौरव होणं ही बाब कौतुकास्पद आहे. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.

**व्दारकादास मंत्री बँक**

एकूण लिक्विडिटी ८१ कोटी २५ लाख रूपये आहे. यावरून बँक किती सक्षम आहे हे आपल्याला नक्कीच लक्षात येईल असे अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा म्हणाले. पुढे बोलतांना ते म्हणाले की, द्वारकादास मंत्री बँकेची स्थापना सन १९६२ मधे झाली होती. बँकेने ३५ टक्के ते ८५ टक्के लाभांशाचे वाटप करून देशभरात नाव केले. कालांतराने बँकेची भरभराट चालू असतांना काही तांत्रिक बाबीवरून बँकेवर प्रशासकाची नियुक्ती झाली व प्रशासकाचे भीतीने बँकेच्या ठेवीदारांनी मोठ्या प्रमाणात ठेवी काढून घेतल्या प्रशासक येण्यापूर्वी बँकेकडे रु.२८१ कोटीच्या ठेवी होत्या बँकेने मागेल त्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत केली त्यामुळे बँकेच्या ठेवी कमी झाल्या. बँकेची आर्थिक स्थिती उत्तम असतांना प्रशासकांनी दिलेल्या अहवालामुळे बँकेवर आर्थिक निर्बंध लागले होते निर्बंधाचे काळात व्यवहार बंद असल्यामुळे बँकेचे नियमित कर्जे मोठ्या प्रमाणात वसूल झाले जानेवारी २०२३ मधे बँकेवर संचालक मंडळ निवडून आले व बँकेस पुन्हा गत वैभव मिळणे साठी संचालक मंडळाने प्रयत्न चालू केले बँकेच्या भाग भांडवलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली,थकीत कर्जाची वसुली केली व भारतीय रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे आवश्यक निकषांची बँकेने पूर्तता केली आणि २६ फेब्रुवारी २०२४ रोजी बँकेवरील लावलेले आर्थिक निर्बंध भारतीय रिझर्व बँकेने उठवले त्यामुळे बँकेचे सर्व प्रकारचे व्यवहार पूर्ववत चालू झाले. बँकेवर आलेल्या सर्व अडीअडचणींवर मात करत बँकेचे सन्माननीय सभासद, ग्राहक व हितचिंतकांचे विश्वासाने बँकेने प्रगतीकडे वाटचाल चालू केली असल्याचे ते म्हणाले. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष शुभम चितलांगे, संचालक डॉ.अदिती सुभाषचंद्रजी सारडा, सी. ए.गिरीश गिल्डा, संतोष लहाने, अंजली पाटील, डॉ.अरुण मुंडे, सुधाकर वैष्णव, रघुनाथ चौधरी, डॉ. राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख सलीम, राम गायकवाड, सतीश धारकर, प्रल्हाद वाघ, बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन एस.एच., राधेश्याम सोनी, शाखाधिकारी धनंजय ताठे, संतोष काळे, कैलास सावंत यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सोलार कंपनीकडून काम**

पडला आहे कारण कोट्यवधी रुपयांचा निधी योजनेच्या माध्यमातून मंजुर करण्यात आला पन काही उपयोग होणार का नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तरी संमधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.कारण त्या कामामध्ये एकदम बोगसगिरी करण्यात आली आहे तसेच मागील काही दीवस कंपनी वाल्यांनी काम बंद केले होते यांचे कारण काय असा ही प्रश्न उपस्थित होतो आहे कारण कामात बोगसगिरी करता येईना म्हणून बंद होते का काम बोगस केले म्हणून बंद असा सवाल नागरिकांना पडला आहे.तसेच काम अनेक महीने झाले सुरू आहे परंतु कामाची स्थिती आहे तीच मग नेमके कंपनीवाले दलाल आहेत का काम करणारे दलाल आहेत असा प्रश्न उपस्थित होतो आहे तसेच काम भोगस होताना दिसत आहे तरी संमधीत प्रशासनाने सोलर काम करणाऱ्या कंपनीवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे भावना व्यक्त केल्या जात आहेत.

## पान सहा वरून

**महाबोधी बौद्ध विहार मुक्तीसाठी**

पय्यातीस महाथेरो, भिक्खु धम्मशिल थेरो,भिक्खु पय्यावर्धन, भिक्खु अचलानंद, आर्या मेहता, भिक्खु धम्मपाल करणार आहेत. दरम्यान महाबोधी बौद्ध विहार हिंदू महंतांच्या ताब्यातुन मुक्त करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करुन पुढील व्यापक आंदोलनाची दिशा ठरविली जाणार आहे. या एकदिवसीय धरणे आंदोलनात, बीड जिल्ह्यातील आंबेडकरी जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांसाठी आनंदाची**

उपरोक्त कार्यक्रमाबद्दल ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी यांना अवगत करण्यात येऊन उचित कार्यवाही करण्याबाबत सक्त सुचना देण्यात याव्यात असे माहिती प्रशासनाने दिली आहे.

**...म्हणून समाजाची स्वाभिमानाने**

असलेला प्रगत, शिक्षित व स्वाभिमानी समाज घडविण्यात काहीतरी योगदान देता येत आहे याचे समाधान आहे. स्वर्गीय मुंडे साहेबांनंतर तुम्ही सर्व लोकांनीच मला मायेचे पांघरून घातले. खंबीर पाठीशी उभे राहून मला शक्ती दिली. त्यामुळे मीही प्रामाणिकपणाने जे जे शक्य असेल तिथे सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम करत मार्गक्रमण करत आहे. कधीही स्वाभिमान सोडला नाही. ऊसतोड कामगार घटकाच्या न्याय हक्कासाठी सदैव प्रयत्नशील राहून त्यांच्या जीवनात उन्नती आणण्याचा आपला प्रयत्न आहे. कष्ट, मेहनतीची तयारी आणि स्वाभिमान या त्रिसूत्री वरच आपला समाज सर्वच क्षेत्रांमध्ये प्रगती साधत आहे. संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य भगवान बाबा प्रतिष्ठानच्या माध्यमातून झाले पाहिजे. भगवान बाबांच्या नावाने असलेल्या या प्रतिष्ठानच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्याचे भाग्य मला लाभल्याचेही पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.

**एनएमएमएस परीक्षेत डॉ.सोनाजीराव**

शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत या विद्यार्थ्यांना ५ वर्षा मध्ये बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण करण्यासाठी ६००००/– रुपयाची शिष्यवृत्ती मिळणार आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मा.शिवाजीभाऊ रांजवण साहेब व सचिव मा.प्रतापभैय्या रांजवण साहेब विद्यालयाचे प्राचार्य यशवंतराव भोसले सर,पर्यवेक्षक जयदेव लांडे सर यांनी केले.तसेच या विदयार्थ्यांना मार्गदर्शन करणारे एन.एम.एम. एस.विभाग प्रमुख अविनाश शिंदे सर,बाबासाहेब जाधव सर,अंकुश गुंड सर व इयत्ता ८ वी चे वर्गशिक्षक केशव लंगे सर, सचीतानंद शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात आले. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना परीक्षेत शिष्यवृत्ती साठी पात्र ठरलेले १८ विद्यार्थी पुढील प्रमाणे. कु. डिगे अनुष्का वैजनाथ,दराडे अस्मिता अशोक,भागवत सिद्धी अरुण,उजगरे श्रावणी नितीन, कवचट समृद्धी दादासाहेब,आणेराव आदिती निलेश,चि.तिडके सुमित संजय,सावंत आनंद सूर्यकांत,सावंत सागर सूर्यकांत,डोरले आदित्य शिवाजी,पेशवे समर्थ कैलास, धार्मिक माऊली मसुराम, पवार रुद्राक्ष अनिल कुमार,राठोड जयदेव ज्ञानेश्वर साळवे,आरुष भिकाराम घुमरे केशव चक्रधर महाडिक आदर्श काशिनाथ, गार्डी परिक्षित सचिन या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पालकासह सत्कार मान्यवरांच्या हस्ते करून अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक तसेच पालक उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**विनयभंग प्रकरणी एक वर्षे कठोर**

त्यानंतर पीडित महिलेने अंभोरा पोलिस ठाण्यात याबाबत फिर्याद दाखल केली. त्यानुसार गुन्हा दाखल झाला होता.तर दि २/४/२०२५ रोजी आष्टी न्यायालयातील कोर्ट क्रमांक ४ न्यायाधीश मा. एम आर बडाख साहेब यांनी ठउउ छ्ज. ८८/२०२२ , सरकार विरुद्ध मंगेश अशोक गावडे या खटल्यामध्ये तपासी अधिकारी पी एस आय शांताराम रोकडे व एपीआय रोहित बेंबरे यांनी तपास करून दोषारोपपत्र दाखल केले होते.सदर गुन्ह्यामध्ये मंगेश अशोक गावडे या आरोपीस दोषी धरून भा द वि कलम ३५४,३५४()(२) अन्वये दोन्ही कलमाखाली प्रत्येकी १ वर्षे कठोर कारावास आणि १५०० रुपये दंड ( दंडाची रक्कम न भरल्यास २ महिने साधी कारावास ) तसेच भादंवि कलम ५०६ व ५०९ अन्वये दोन्ही कलमाखाली प्रत्येकी ६ महिने साधी कारावास आणि ५०० रुपये दंड ( दंडाची रक्कम न भरल्यास १ महिना साधी कारावास ) अशी शिक्षा सुनावली आहे. दंडाच्या रक्कमेपैकी ३५०० रुपये फिर्यादीस नुकसान भरपाई म्हणुन देण्याचाही हुकुम झालेला आहे. सदर खटल्यामध्ये ५ साक्षीदार तपासले होते.अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता चंद्रकांत जावळे यांनी तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही एस गव्हाळे यांनी कामकाज पाहिले. तसेच पैरवी अधिकारी अधिकारी सौ साप्ते मॅडम आणि नितीन बहिरवाळ यांनी सहाय्य केले.

**वरपगावच्या शेतकरी कन्येची**

नसून समाजाच्या सर्वांगीण विकासाचे साधन आहे, या ध्येयाने त्या प्रेरित आहेत.डॉ. माधुरी देशमुख यांचा हा प्रवास केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील आणि शेतकरी कुटुंबातील तरुण–तरुणींना एक प्रेरणादायी संदेश देणारा आहे.

**नवोदित लेखकास**

ह.भ.प. नवनाथ महाराज इंगळे,वरखेडचे सरपंच सर्व श्री विनोद पाटील ढोकणे, सोसायटीचे चेअरमन जनार्धन पाटील हारदे, प्रा.रामकृष्ण नवले सर, संभाजीराव पाडळे, दादाभाऊ निकम, शिरसगावचे उपसरपंच दत्तात्रय पोटे, ग्रामसेवक डेंगळे भाऊसाहेब, अशोक शिंदे, ,दत्तात्रय आगळे विधाटे, संभाजी झगडे आदी उपस्थित होते

**महापुरुष वकृत्व स्पर्धांचे**

प्रा.राम गायकवाड ९४२३२०३१९९, महादेव इनकर ९४२०१७११७७ ,सचिन वडमारे ९०२८४६०१०२ यांनासंपर्क साधावा. असे आवाहन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा...
पुण्यभूमी



## कुडाळमध्ये आजपासून जलवाहिनी दुरुस्ती काम सुरू

**कुडाळ :** शहरातील जिजामाता चौक ते अभिमन्यू हॉटेलपर्यंतची नवीन पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू असून, शुक्रवार (ता. ४) व शनिवारी (ता. ५) जलवाहिनी व व्हॉल्व जोडणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. कुडाळ शहरातील कुडाळेश्वरवाडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर, रेल्वेस्टेशन रोड, पोलीस ठाणे, बाजारपेठ, पानबाजार, नाडकर्णीवाडा, हॉटेल गुलमोहर ते पोस्ट ऑफिस, भैरववाडी, सत्कार पाणंद, माठेवाडा, छत्रपती शिवाजी महाराजनगर, केळबाईवाडी, जुनी व नवीन तुपटवाडी, मस्जिद मोहल्ला, अभिनवनगर १ व २, नवीन नाबरवाडी, पडतेवाडी (आपटे वॉल), गणेशनगर, इंद्रप्रस्थनगर, हिंदू कॉलनी, जुनी नाबरवाडी, औंदुबरनगर या भागातील पाणीपुरवठा जलवाहिनी व व्हॉल्व जोडणीच्या काळात बंद राहील. नळधारकांनी पुरेसा पाणीसाठा करून ठेवावा. जलवाहिनी जोडणीचे काम पूर्ण होताच संबंधित भागात कमी-जास्त दाबाने पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल, याची नळधारकांनी व नागरिकांनी नोंद घेऊन नगरपंचायतीस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लाखो रुपयांचा खर्च तरी पाणीटंचाई मिटेना

## कोल्हेधव वासियांचा घसा पडला कोरडा

◆ **मोखाडा (वार्ताहर) :**

गाव पाड्यातील नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी शासनाकडून ग्रामपंचायतीना वर्षाकाठी लाखो रुपयांचा निधी मंजूर केला जातो.तरीदेखील गाव पाड्यातील पाणी टंचाईची समस्या कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे.त्यामुळे अशा मानवनिर्मित पाणी टंचाईचे चटके गेल्या काही वर्षांपासून कोल्हेधव गावातील नागरिकांना सहन करावे लागत आहेत.

सहा घरांची वस्ती असलेल्या कोल्हेधव गावात जेमतेम तीस ते चाळीस माणसं राहतात येथील नागरिकांना इतर मुलभूत सुविधांची तर वानवा आहेच परंतु त्याही पेक्षा पिण्यासाठी चांगले पाणी मिळावे यासाठी मागील सात आठ वर्षांत वीस ते पंचवीस लाख रुपयांचा निधी हा केवळ पाणी टंचाई दुर करण्यासाठी



ग्रामपंचायतीकडून नवीन विहीर बांधणे, जुन्या विहिरीची दुरुस्ती करणे यासह सौरऊर्जेवर चालणारी नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे अशा पाणी पुरवठ्याच्या योजनांवर लाखो रुपयांचा निधी आतापर्यंत खर्च झालेला असताना ही पाणी टंचाई संपायला तयार नाही. त्यामुळे खर्च केलेला निधी नेमका जातो कुठे? याचा प्रशासनाने शोध घेतला पाहिजे.

खर्च केलेला असताना ही येथील नागरिकांना महिन्याभरापासून पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. महत्वाचे म्हणजे कोल्हेधव गाव मोखाडा तालुक्यात येत असून पाणी पुरवठा करण्यासाठी तालुक्यातील बलद्याचापाडा मार्गाने नाशिक जिल्ह्यातील आडगाव, काकडवळण या मार्गाने जवळपास चाळीस ते पन्नास किलोमीटर चे अंतर पार करून कोल्हेधव गावाला पाणी पुरविण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली आहे.

> ग्रामपंचायतकडून विहीरीची दुरुस्ती करून येत्या दोन तीन दिवसांत नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय करुन दिली जाईल.
> - **जी. लष्करी,** ग्रामपंचायत अधिकारी आसे

परंतू टॅंकर ये जा करण्यासाठी संपूर्ण दिवस जाणार असल्याने ग्रामपंचायत प्रशासनाने पर्यायी पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे अशी सूचना पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात आल्याचे कर्मचारी यांनी बोलताना सांगितले आहे.मुळात कोल्हेधव गावात यायला जायला पूल बांधला असता तर शासनाचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचले असते.परंतू लोकसंख्येचा आकडा लक्षात घेता या पाड्याला पुरेसा निधी शासनाकडून उपलब्ध होण्यास अडचण येत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

### स्टीकर स्कॅन केल्यावर मिळणार आंब्याची माहिती

## हापूसमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी ‘क्यूआर कोड’

◆ **रत्नागिरी (प्रतिनिधी) :**

हापूसमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी जीआय मानांकन घेतलेल्या आंबा बागायतदारांसाठी क्यूआर कोड देण्यास सुरुवात केली आहे. महिन्याभरात ६५ हजार क्युआर कोडचे वितरण करण्यात आले होते. अस्सल हापूसची ओळख पटवून देणारा हा क्युआर कोड बागायतदारांना उपयुक्त ठरत आहे. मालाच्या दर्जाबरोबरच मार्केटिंगही चांगल्या प्रकारे होत असल्याची माहिती कोकण हापूस आंबा उत्पादक आणि उत्पादक विक्रेते सहकारी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विवेक भिडे, सचिव मुकुंद जोशी यांनी दिली.

गेल्या काही वर्षांत परराज्यातील आंबा कोकणचा हापूस म्हणून बाजारात विकला जात होता. त्याला आळा बसण्यासाठी बागायतदारांकडून वारंवार पाठपुरावा केला जात होता. दोन वर्षापूर्वी हापूस नावाने भौगोलिक निर्देशांक (जीआय टॅग) प्राप्त झाल्यामुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या पाच जिल्ह्यातील आंबा हा हापूस नावाने विकला जाऊ लागला. तसे जीआय सर्टिफिकेटही शेतकऱ्यांना देण्यास सुरुवात झाली.

त्यासाठी कोकण कृषी विद्यापीठासह तीन संस्थांची निवड केली गेली. तरीही परराज्यातून येणारा आंबा हापूस नावाने विकला जात होता. मोठ्या प्रमाणात होणारी भेसळ थांबवण्यासाठी क्युआर कोडचा पर्याय आणला गेला. त्यासाठी शेतकऱ्याला क्युआर कोड स्टीकर दिला जातो. विक्रीसाठी पाठवलेल्या फळावर स्टीकर लावण्यात येतो. तो




**स्टीकरचा कालावधी १४ दिवसांचा**

फळावर लावलेला स्टीकरचा वापर पुन्हा होऊ नये यासाठी यंदापासून उपाययोजना करण्यात आली आहे. स्टीकर वापराचा कालावधी १४ दिवसांचा ठेवण्यात आला आहे. त्यानंतर तो पुन्हा वापरता येणार नाही. यापूर्वी स्टीकर काढून पुन्हा वापरल्याचे प्रकार पुढे आले होते. त्यामुळे ही कार्यवाही करण्यात आल्याचे जोशी यांनी सांगितले.

स्कॅन केल्यावर हापूसची सविस्तर माहिती मिळते.

त्यामध्ये बागायतदार कोण, बागेचे फोटो आणि औषधे कोणती फवारली जातात याचीही माहिती मिळते. चांगला आंबा असलेल्या बागायतदाराची बाजारातील पत वाढत आहे. २०२३ मध्ये अडीच लाख, तर २०२४ मध्ये साडेतीन लाख स्टीकर विक्रीला गेले होते. त्याचा फायदाही आंबा बागायतदारांना झाला आहे. आतापर्यंत ६५ हजार स्टीकर बागायतदारांनी घेतल्याचे जोशी यांनी सांगितले.

## रत्नागिरीत टाटा पंच कारची एसटी बसला समोरासमोर धडक

◆ **रत्नागिरी (प्रतिनिधी) :**

स्वस्ति मायक्रो फायनान्स कंपनीच्या टाटा पंच कार आणि एसटी बस यांच्यात झालेल्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर एकजण किरकोळ जखमी झाला. हा अपघात रत्नागिरी शहराजवळील कारवांचीवाडी येथे गुरुवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडला. मिळालेल्या माहितीनुसार, रत्नागिरीच्या मुख्य रस्त्यावर असलेल्या कारवांचीवाडी जवळ हा अपघात झाला. स्वस्ति फायनान्स या मायक्रो फायनान्स कंपनीच्या टाटा पंच गाडी समोरून येणाऱ्या एसटी बसशी समोरासमोर टक्कर झाली. या गाडीतून कंपनीचे पाच कर्मचारी प्रवास करत होते. हे सर्व कर्मचारी बुधवारी मध्यरात्री १२ वाजता मुंबईतील चेंबूरमधून रत्नागिरीच्या दिशेने निघाले होते. गुरुवारी सकाळी रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या विकास नौसरे (वय ३४, रा. मुंबई) याला अपघातानंतर तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत होवून रक्तस्त्राव मोठ्या प्रमाणात झाल्याने मृत्यू झाला. तो स्वस्ति फायनान्स कंपनीत युनिट मॅनेजर या पदावर कार्यरत होते. कारवांचीवाडी येथील रस्त्यावर असलेले डायव्हर्जन गाडीचालकाच्या लक्षात न आल्याने या गाड्यांची समोरासमोर टक्कर झाली असल्याचे सांगितले जात आहे.

## वेचक

### अनारी गावात बिबट्याची दहशत

**चिपळूण :** तालुक्यातील अनारी गावात सध्या बिबट्याची दहशत सुरू आहे. विशेष म्हणजे या बिबट्याने आतापर्यंत १० ते १२ पाळीव



जनावरांसह कोंबड्या फस्त केल्या असून, यामुळे शेतकरीवर्गाचे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकारामुळे अनारी गावात भीतीचे वातावरण आहे. शनिवारीदेखील पुन्हा असाच प्रकार उघडकीस आला असून वाडीपासून २ कि.मी अंतरावर बिबट्याने फस्त केलेल्या जनावरांचे अवशेष ग्रामस्थांना आढळून आले. याची कल्पना ग्रामस्थांनी वनविभागाला दिली आहे. गणेशवाडी येथील शेतकरी अनंत पवार यांची काही दिवसांपूर्वी म्हैस बिबट्याने मारल्याचा प्रकारही समोर आला आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.

### चिपळूणमध्ये होणार खेळाडू विकसन प्रकल्पाची चाचणी

**चिपळूण :** चिपळूणमध्ये ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्पाची वर्ष २०२४-२५ मधील अंतिम चाचणी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल (निगडी) आणि टाटा ट्रस्ट आयोजित ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्पाची या वर्षातील अंतिम मैदानी व आरोग्य चाचणी झाली. या चाचणीमध्ये चिपळूण केंद्राच्या पाचही उपकेंद्रांमधील एकूण २७० खेळाडूंनी सहभाग घेतला. हा उपक्रम खेळाडूंच्या शारीरिक, मानसिक आणि मैदानी कौशल्यांमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने वर्षभर आयोजित करण्यात आला होता. ही चाचणी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने घेण्यात आली. आरोग्य चाचणीसाठी पाच डॉक्टरांची टीम दोन दिवस उपस्थित होती.

### शहरात प्रदूषणावर चर्चासत्राचे आयोजन

**चिपळूण :** शहरातील सजग स्वास्थ्य क्लिनिकच्या अकराव्या वर्धापन दिनानिमित्त चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. प्रदूषण या विषयावर



रविवारी (ता. १३) सायंकाळी ५ ते ७ यावेळेत सावरकर सभागृह येथे हे चर्चासत्र होणार आहे. ‘प्रदूषण रोखूया व आरोग्य जपूया’ याविषयी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्रात डॉ. सुनील कोतकुंडे, डॉ. अभिजित मोरे, डॉ. श्रुतिका कोतकुंडे हे भाष्य करणार आहेत. या चर्चासत्राला सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. सुनील कुतकुंडे व डॉ. श्रुतिका कुतकुंडे यांनी केले आहे.

### वैभववाडीला अवकाळी पावसाने झोडपले

**सावंतवाडी :** सावंतवाडीमध्ये पावसाने चांगलीच हजेरी लावली. अचानक जोरदार हजेरी लावल पावसामुळे याचा फटका नागरिकांना बसला.



वैभववाडी ते करूळ दरम्यान महामार्ग रुंदीकरणाचे काम चालू आहे. या पावसाचा फटका या मार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकी चालकांना बसला. रस्त्यात ठिकठिकाणी चिखलमाती साचली होती. चिखलात पडून अनेक दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात अनेक मोटरसायकल चालक जखमी झाले. पावसाने पुढील काही दिवस जोर असाच ठेवल्यास आंबा व काजू बागायतदार, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. तसेच वैभववाडी शहरात आठवडा बाजाराला आलेल्या ग्राहकांचीही त्रेधातिरपीट उडाली.

### दीप्ती विश्वासरावचे एमबीबीएसमध्ये यश

**राजापूर :** तालुक्यातील झर्ये येथील दीप्ती विश्वासराव हिने अकोला येथील शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत ती एमबीबीएस ही पदवी प्रथम गुणवत्ता श्रेणीमध्ये प्राप्त केली आहे. प्रतिकूल परिस्थितीचा सामना करताना दुर्दम इच्छाशक्तीला प्रयत्नांची जोड देत तिने डॉक्टर होण्याची स्वप्नपूर्ती केल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. एमबीबीएस ही पदवी प्रथम गुणवत्ता श्रेणीमध्ये प्राप्त केल्याबद्दल दिशा परिवारचे राजापूर येथील प्रतिनिधी गजानन जोशी, अनंत रानडे, संदीप देशपांडे, अजित हर्डीकर, प्रवीण करंबेळकर यांनी दीप्ती हिची प्रत्यक्ष घरी भेट घेऊन अभिनंदन केले. या वेळी तिच्यासह तिचे आई-वडील उपस्थित होते.

## 'आयडीबीआय'ची अंकुर फंडसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती

**मुंबई :** भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल)ने आयडीबीआय कॅपिटल मार्केट्स अँड सिक्युरिटीज लिमिटेड (आयसीएमएस)ची बीपीसीएल अंकुर फंडसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. ही फंड उच्च -क्षमतेच्या सुरुवातीच्या टप्प्यातील स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे. प्रामुख्याने बीपीसीएलच्या व्यवसाय क्षेत्रांशी संबंधित क्षेत्रांमध्ये

IDBI BANK



काम करणाऱ्या स्टार्टअप्समध्ये बीपीसीएल त्यांच्या 'अंकुर' उपक्रमाद्वारे स्टार्टअप्सना पाठिंबा देण्यात अग्रेसर आहे. २०१६ पासून, त्यांनी सुमारे २८ कोटी रुपयांच्या अनुदान निधीसह ३० स्टार्टअप्सना पाठिंबा दिला आहे. हा उपक्रम देशात उद्योजकता आणि नवोपक्रमाला चालना देणारी एक सहाय्यक परिसंस्था विकसित करण्याच्या बीपीसीएलच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे.

## सीईटी सेलला रत्नागिरीचे वावडे

### विद्यार्थ्यांची फरफट ; जिल्ह्यात दोनच केंद्र




◆ **रत्नागिरी (वार्ताहर) :**

बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रातील अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी प्रवेश घ्यायचा असेल तर एमएचटी सीईटी परीक्षा द्यावी लागते. रत्नागिरी जिल्ह्यात दरवर्षी साडेपाच ते सहा हजार विद्यार्थी बारावी विज्ञान शाखेची परीक्षा देतात. मात्र रत्नागिरी हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असताना शहरात एकही परीक्षा केंद्र नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची परीक्षेसाठी फरफट तर होते, शिवाय पालकांना आर्थिक भुर्दंडही बसत आहे.

एमएचटी सीईटी परीक्षेसाठी अभ्यासक्रम हा बारावी विज्ञान अभ्यासक्रमासारखाच असतो. यात काही बदल नसतो. ही परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून घेतली जाते. अभियांत्रिकीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, किंवा गणित या तीन विषयातील दोन विषयांचा पेपर द्यावा लागतो, तर वैद्यकीय क्षेत्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विषयांचे पेपर द्यावे लागतात.

**आवश्यक सुविधा :**

ऑनलाईन परीक्षा घेण्यात येत असल्यामुळे त्यासाठी सुसज्ज अभियांत्रिकी महाविद्यालयाची आवश्यकता आहे. त्यामध्ये २०० ते ३०० संगणक, सर्व संगणक लॅन नेटवर्कमध्ये असणे आवश्यक आहे. त्याशिवाय उत्तम नेटवर्क, वीजप्रवाह खंडित झाल्यास तातडीने बॅकअप सुविधा, सीसीटीव्ही यंत्रणा, वॉशरूम, परीक्षा घेण्यासाठी मनुष्यबळ या सर्व गोष्टींची आवश्यकता आहे. रत्नागिरी शहरात या सुविधा उपलब्ध असताना विद्यार्थ्यांना अन्य तालुक्यात जावे लागते, हे दुर्दैव आहे.

## राष्ट्रीय पॅरा सायकलिंग रोड चॅम्पिअनशिपमध्ये हुआफ्रिद दुसऱ्या क्रमांकावर

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

पहिली नॅशनल पॅरा सायकलिंग रोड चॅम्पिअनशिप नुकत्याच हैदराबाद येथे आयोजित केलेल्या या स्पर्धेमध्ये हुआफ्रिद बिलिमोरिया ने २ रा क्रमांक पटकवला. हुआफ्रिद बिलिमोरिया हा आता ट्रायथलॉन आणि सायकलिंगमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्यास सज्ज झाला आहे, असे करणारा तो पहिला पॅरा ॲथलीट असणार आहे, यावरून पॅरा स्पोर्ट्स किती विकसित होत आहे हे दिसून येते.

१८ किलोमीटर लांबीची ही रेस सोपी शर्यत नव्हती. हैदराबादमध्ये, दुपारी १ वाजता, ४२+ अंश तापमान, हैदराबादची उष्णता, श्वास घेण्यास होणारा त्रास अशा परिस्थितीत तो दुसऱ्या क्रमांकावर आला होता. शर्यतीपूर्वी हुआफ्रिद २०२४ मध्ये एका दुर्मिळ ऑटोइम्यून डिसऑर्डरने अंथरुणाला खिळून होता. त्याला फक्त ४ महिन्यांचे प्रशिक्षण मिळाले होते. स्पर्धमध्ये त्याला खुप काळजी वाटत होती काय करायचे काही सुचत नव्हते, तो एका क्षणी शर्यत सोडू इच्छित होता. त्याचे हृदय आणि



फुफ्फुस एकमेकांशी लढत होते. शर्यतीनंतर त्याच्या शरीराचे तापमान १०५ अंशांपर्यंत पोहचले होते. फक्त बर्फाच्या शेकामुळे त्याला बरे वाटले नाहीतर त्याला नक्कीच रुग्णालयात दाखल करावे लागले असते, इतर स्पर्धक अतिशय कडवट झुंज देणारे होते, जिंकण्यासाठी कोणत्याही स्तरावर जाण्यास तयार असणाऱ्या स्पर्धकांशी शर्यत होती पण हुआफ्रिदने जिद्द सोडली नाही.

या विजयाचे श्रेय तो त्याच्या मार्गदर्शक डॉ. मिकी मेहता यांच्या बिनशर्त दिलेला पाठिंबा व यांच्यावर असलेल्या विश्वासाला जातो. ज्यांनी त्याला योगा व होमिओपॅथमध्ये मार्गदर्शन केले. डॉ. मिकीच्या सतत प्रेरणादायी, नैतिक पाठिंब्याने हुआफ्रिदचे मानसिक आरोग्य बरेच चांगले आणि स्थिर ठेवण्यास खूप मदत झाली. त्यामुळे हुआफ्रिदीला पॅरा स्पोर्ट्सच्यामध्ये जायचे प्रोत्साहन मिळाले.

या ३ वर्षांत डॉ. मिकी मेहता यांचे मार्गदर्शन व त्यांच्याबरोबर केलेली मेहनत व सतत सरावामुळे हुआफ्रिदचा आत्मविश्वास वाढण्यास खूप मदत झाली. हुआफ्रिद नुसार ही फक्त सुरुवात आहे व त्याचे पॅराऑलम्पियन बनण्याचे स्वप्न नक्की पूर्ण होणार. तसेच डॉ. मिकी मेहता यांची मुलगी करिश्मा मिकी मेहता हिचा सुद्धा हुआफ्रिदच्या या विजयामध्ये मोलाचा वाटा आहे. हुआफ्रिद बरोबर डॉ. मिकी मेहता व त्यांच्या मुलीने हुआफ्रिद साठी प्रायोजकांना पुढे येण्याची विनंती केली आहे, जर त्याला सर्वांचा सपोर्ट मिळाला तर तो नक्की भारताचे नाव मोठे करणार यात शंका नाही असे करिश्मा मिकी मेहता यांनी विश्वासाने सांगितले. आपल्या भारताचे नाव पॅराऑलम्पिकमध्ये मोठे करण्यासाठी काहीही करण्याची हुआफ्रिदची तयारी आहे.

## 'थर'ला सामाजिक चित्रपटाचा पुरस्कार मिळवण्यात यश

### शिक्षकाने चित्रपटात मांडलेल्या कैफियतीचे कौतुक

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

विलास चव्हाण हे शिक्षक आहेत परंतु कलेच्या माध्यमातून विविध क्षेत्रात काम करून त्यांनी आपल्यातल्या अभिनयाला प्रेक्षकांपर्यंत पोहोचवलेले आहे. काही विषय हे फक्त शिकवता येत नाही तर ते कलाकृतीच्या माध्यमातून दाखवले तर त्याचा परिणाम होऊ शकतो हे त्यांना जाणवले. मानवी थर म्हटल्यानंतर प्रेक्षकांना दहीकाल्यातील गोविंदाची आठवण होणे साहजिकच आहे. या गोविंदावर अनेक चित्रपट आले आहेत. परंतु यात सहभागी झालेल्या गोविंदाला अनेक अडचणीतून, वेदनेतून, दुखापतीतून जावे लागते. वेळप्रसंगी



मृत्यूलाही सामोरे जावे लागते. काहींना आयुष्यभराचे अपंगत्व येते. इतक्या दुःखद घटना या काळात घडत असतात. हे जरी खरे असले तरी त्याचा पसारा वर्षानुवर्ष वाढताना दिसलेला आहे. शासनाने दहीकाल्याला खेळाचा दर्जा देऊन या गोविंदाचे महत्त्व वाढवलेले आहे. उत्सवात आणि उत्सवानंतर गोविंदाला होणाऱ्या यातना, वेदना आणि त्यातून भरकटले जाणारे कुटुंबाचे चित्र चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचावे याचा ध्यास विलास चव्हाण या शिक्षकाने घेतला. प्रबोधन करायचे असेल तर चित्रपटाशिवाय दुसरे माध्यम नाही हे त्यांनी ओळखले आणि यातूनच त्यांनी 'थर' या चित्रपटाची निर्मिती करण्याचे ठरवले. उमेश पवार आणि अमित मोहिते यांनी लेखन, दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली. मनोरंजन आणि प्रबोधन यांचा समन्वय त्यांनी या चित्रपटामध्ये साधला होता. वैदेही चव्हाण या चित्रपटाच्या सहनिर्मात्या असून रंगराव घागरे हे निर्मिती प्रमुख आहेत. राज मोहिते यांनी वितरक आणि सोशल मिडिया ही जबाबदारी पार पाडलेली आहे.

निव्वळ सामाजिक बांधिलकी जपण्याच्या हेतूने या चित्रपटाची निर्मिती केली होती परंतु राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर दिल्या जाणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात या चित्रपटाचा विचार होईल असे वाटले नव्हते.'

## राजराजेश्वरी देवीच्या दर्शनाला भाविकांची गर्दी

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

आपत्कालीन परिस्थितीत दुसऱ्याला मदत करणे मानवतेचा खरा धर्म आहे, असा संदेश देणाऱ्या ताडदेवात राजराजेश्वरी प्रतिष्ठान न्यासच्या वतीने चैत्र पाडव्यापासून शारदोत्सवाला आरंभ झाला. मुंबईतील पहिला सार्वजनिक चैत्र नवरात्रौत्सव म्हणून ओळख असलेल्या या उत्सवाला न्यासने आपल्या नित्याच्या परंपरेनुसार कुठेही कमतरता ठेवलेली नाही. चैत्र शु. १ गुढीपाडव्याच्या शुभदिनी राजराजेश्वरीची वाजत-गाजत प्रतिष्ठापना करण्यात आली. भाविकांच्या नवसाला पावणारी देवी म्हणून ख्याती असणाऱ्या या देवीच्या दर्शनाला रविवार पासूनच लोकांची रीघ लागली आहे. उबाठा शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे, केदार दिघे, नृत्य दिग्दर्शक उमेश जाधव आदी मान्यवरांनी देवीचे दर्शन घेतले आहे. न्यासचे अध्यक्ष अतुल विचारे, सचिव हर्षल गुरव, खजिनदार जितेंद्र घाडी आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते हा देवीचा उत्सव देव, देश आणि धर्म रक्षणावर आधारित ठरावा आणि मानवी मूल्ये जोपासणारा असावा, असा प्रयत्न करताना दिसत आहेत.

### ८० पैकी ६२ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणार

## जिल्हा परिषद शाळांची ‘नवोदय’मध्ये भरारी

◆ **रत्नागिरी (वार्ताहर) :**

रत्नागिरी केंद्र सरकारअंतर्गत चालवण्यात येणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी निवड चाचणी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, ८० पैकी ६२ विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणारे ग्रामीण भागातील विद्यार्थी आहेत. जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या माध्यमातून राबवलेल्या विविध उपक्रमांमुळे नवोदय विद्यालयातील प्रवेशपरीक्षेत यश मिळाले आहे.

रत्नागिरी जिल्हा परिषदेने विद्यार्थ्यांची गुणवता वाढावी यासाठी



चार वर्षांपूर्वी गुणवत्ता कक्षाची स्थापना केली होती. त्याला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनीही चांगले सहकार्य केले. त्याचबरोबर इस्रो-नासा अभ्यासदौरा, प्रज्ञाशोध परीक्षा, नवोदय विद्यालय निवड परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा यासारख्या स्पर्धा परीक्षांवर अधिक लक्ष केंद्रित केले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांची परीक्षा देण्याची मानसिक तयारी झाली होती तसेच भरपूर सराव झाल्यामुळे परीक्षेतील पेपरही सोपे जात होते. नवोदयसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमधील ७८ टक्के विद्यार्थी हे ग्रामीण भागात शिक्षण घेणारे आहेत. नवोदयच्या प्रवेशपरीक्षेसाठी निवड झालेल्या विद्यार्थीसंख्येचा आलेख गेल्या काही वर्षात चढताच आहे. गतवर्षी ५१ विद्यार्थी निवडले गेले होते. यावर्षी त्यात वाढच झाली आहे. जिल्हा परिषद शाळेतील मुलांच्या या यशामध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पूजार यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी शिक्षण विभागात राबवलेले उपक्रमही साहाय्यभूत ठरले आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परिक्षित यादव यांनी अभिनंदन केले आहे.

> जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची गोडी लागावी, स्पर्धा परीक्षेचा टक्का वाढवा, स्पर्धा परीक्षेविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हाव, यासाठी शिक्षण विभागाने प्रयत्न केले. त्याचाच भाग म्हणजे नवोदय परीक्षेतील यश होय, ही अभिमानस्पद गोष्ट आहे.
> - **बी. एम. कासार,** शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

**तालुक्यातील यशस्वी विद्यार्थी**

| तालुका | विद्यार्थी |
|---|---|
| दापोली | ८ |
| मंडणगड | ४ |
| खेड | ९ |
| गुहागर | ४ |
| चिपळूण | १ |
| संगमेश्वर | १० |
| राजापूर | १३ |
| लांजा | ९ |
| रत्नागिरी | ४ |

## राष्ट्रीय मिल मजदूर संघ ग्रंथालयाला सर्वोत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई मराठी ग्रंथालय शतकोत्तर रौप्यमहोत्सवी 'अ' वर्ग शासनमान्य जिल्हा ग्रंथालय यांच्या सहकार्याने आणि ब्रहन्मुंबई जिल्हा ग्रंथालय संघाच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक अधिवेशनात, नुकतेच राष्ट्रीय मिल मजदूर संघ सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालयाला यंदाचा सर्वोत्कृष्ट ग्रंथालय हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

गतवर्षांपासून ग्रंथ चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार सोहळा सुरू करण्यात आला आहे. हा पुरस्कार उपाध्यक्ष बजरंग चव्हाण,सुनिल बोरकर, मारुती शिंत्रे, मधू घाडी, ग्रंथपाल ममता घाडी, दीपक वाळवे, आदी मान्यवरांनी



स्वीकारला. संघटनेचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर यांनी मागील विधानसभा अधिवेशन विधानपरिषदेत एकूण वाचनालयांच्या समस्येला वाचा फोडली होती. रा. मि. म. संघ ग्रंथालयाने उत्तम सेवा बजावतांना सर्वोत्तम कार्य केल्याबद्दल, जिल्हा ग्रंथालय संघातर्फे सर्वोत्कृष्ट ग्रंथालय म्हणून निवड करण्यात आली. समारंभाचे अध्यक्ष दिलीप पांडुरंग कोरे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

दादर येथील मुंबई ग्रंथ संग्रहालयाच्या कै. प्रा. गावस्कर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सभागृहात वार्षिक अधिवेशन पार पडले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कोकण विभाग ग्रंथालयाचे अध्यक्ष दिलीप कोरे होते. समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक संगीता अरबुते आणि अन्य साहित्यिक उपस्थित होते.

# साप म्हणून भुई धोपटण्याचे, विरोधी पक्षांचे प्रयत्न

वक्फ सुधारणा विधेयक आणून केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. वक्फची संपत्ती आणि मालमत्तेच्या व्यवस्थापनात पारदर्शकता असावी, व्यवहार करताना दक्षता घेतली जावी आणि उत्तरदायित्व निश्चित करण्यात यावे यासाठी केंद्र सरकारने संसदेत वक्फ सुधारणा विधेयक मांडले व लोकसभा व राज्यसभेत दीर्घकाळ चर्चा झाली. देशात विविध राज्यांत वक्फ बोर्डाकडे लक्षावधी एकर जमीन व मालमत्ता आहे. त्याची किमत कित्येक लाख कोटी रुपये आहे. या मालमत्तेचा विनियोग कसा होता, त्याला लाभ कोणाला होतो, सर्वसामान्य जनतेला त्याला काय फायदा होतो, वक्फच्या जमिनी कोण विकत घेतो व कशा पद्धतीने खरेदी-विक्रीचा व्यवहार होतो हे सर्व वर्षानुवर्षे गूढ होते. आता मात्र वक्फ सुधारणा विधेयकामुळे त्यावर सरकारचे लक्ष राहणार आहे. मूठभर लोकांना कोटी कोटी रुपयांचे मालमत्तेचे व्यवहार करणारी मनमानी करता येणार नाही. वक्फ बोर्डाच्या मालमत्तेवर आजवर कोणाचेच नियंत्रण नव्हते. वक्फ बोर्ड सुद्धा कोणाच्याही जमिनीवर आपली जमीन म्हणून दावा करीत होते. वक्फ बोर्डाने दावा केलेली व वक्फ बोर्डाच्या ताब्यात असलेल्या जमिनीची शेकडो प्रकरणे आज न्यायालयात प्रलंबित आहेत. मुस्लीम व्होट बँकेला नाराज करायला नको म्हणून काँग्रेसने सत्तेवर असताना वक्फ बोर्डाला अनुकूल असेच सदैव निर्णय घेतले होते. वक्फ बोर्डाच्या कारभाराला शिस्त लावण्यासाठी, भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी व कामकाजात पारर्शकता आणण्यासाठी केंद्राने वक्फ सुधारणा विधेयक आणले व संसदेपुढे चर्चेसाठी ठेवले. वक्फ बोर्डाची संपत्ती सुरक्षित राहावी आणि व त्याचा विनियोग योग्य पद्धतीने व्हावा हा हेतू सुधारणा विधेयकात आहे. सुधारणा विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यावर वक्फ बोर्डाला त्यांच्या संपत्तीची नोंद डिजिटल करणे बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे वक्फच्या मालमत्तेवर व व्यवहारावर सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून बारीक लक्ष ठेवले जाणार आहे. वक्फ बोर्डाला आपले आर्थिक व प्रशासनिक अहवाल नियमितपणे सादर करावे लागणार आहेत. या सर्व चांगल्या गोष्टी सुधारणा विधेयकात असताना विरोधी पक्ष विशेषतः काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, सपा हे पक्ष साप साप म्हणून भुई का धोपटत आहेत?

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरण रिजिजू यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करताना कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा सरकारचा प्रयत्न नाही असे अनेकदा सांगितले. गैर मुस्लिमांची तेथे नेमणूक होणार नाही हेही स्पष्ट केले. तरीही वक्फ सुधारणा विधेयक हे मुस्लिमांच्या विरोधात आहे, असे ऊर बडवून भाजपा विरोधक सांगत होते. वक्फ सुधारणा विधेयक म्हणजे केवळ प्रशासकीय व्यवस्थेचा मुद्दा आहे, त्याच्याशी धार्मिक संबंध जोडू नये असे सरकारच्या वतीने वारंवार सांगितले गेले, पण मुस्लीम व्होट बँक डोळ्यांसमोर ठेऊन असदुद्दीन ओवेसींपासून ते अखिलेश यादवपर्यंत विरोधी पक्षांचे नेते टाहो फोडताना दिसत होते. काश्मीरला विशेषाधिकार देणारे घटनेतील ३७० कलम केंद्र सरकारने काढून घेतले तेव्हाही मोदी सरकार मुस्लिमांच्या विरोधात आहे व केवळ हिंदुत्वाचा अजेंडा राबिवण्यासाठी ३७० कलम रद्द केले आहे असा प्रचार विरोधी पक्षांनी केला. मुस्लिमांचा संताप रस्त्यावर प्रकट होईल असाही इशारा दिला. प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. मुस्लिमांना उत्तम शिक्षण, रोजगार व आरोग्य सेवा पाहिजे आहे. त्यासंबंधी विरोधी पक्ष एक शब्दानेही बोलत नाही. केंद्र सरकारने सीएए कायदा लागू केला तेव्हाही विरोधी पक्षांनी मुस्लिमांना त्यांचे नागरिकत्व गमवावे लागणार, अशी भीती घातली होती. सीएएची अंमलबजावणी सुरू होऊन दोन वर्षे उलटली, देशात एका तरी मुस्लिमाचे नागरिकत्व रद्द झाले आहे का, असा प्रश्न अमित शहा यांनी लोकसभेतच विचारला तेव्हा विरोधी बाकांवर सारे चूपचाप बसलेले दिसले. तिहेरी तलाक पद्धत रद्द झाली तेव्हाही मोदी सरकार व भाजपा हे मुस्लीम विरोधी असून मुस्लिमांच्या धार्मिक प्रश्नात हस्तक्षेप करीत आहेत, असा विरोधी पक्षांनी आरोप केला. पण तिहेरी तलाक पद्धत रद्द झाल्याने मुस्लीम महिलांची फार मोठ्या जाचातून सुटका झाली. अनेक ठिकाणी मुस्लीम महिलांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मनापासून आभार मानले. मुस्लीम व्होट बँकेसाठी आणि भाजपाचा द्वेष करण्यासाठी विरोधक कसे एकवटतात याचे वक्फ सुधारणा विधेयक हे आणखी एक उदाहरण आहे.

यापुढे सरकारी मालमत्ता वक्फच्या मालकीची राहणार नाही. मालमत्तेचा वाद असेल, तर तो सोडविण्याचा अधिकार यापुढे जिल्हाधिकाऱ्याला राहील. वक्फची नोंदणी, लेखा, लेखा परीक्षण यासाठी केंद्र सरकार नियमावली बनवणार आहे, वक्फकडे ज्या सरकारी मालमत्ता असतील त्या सरकारला परत करणे भाग आहे. आम्ही वक्फ कायद्याची सुधारणा मान्य करणार नाही, अशी बेताल वक्तव्ये काही विरोधी नेत्यांनी केली आहेत. पण कायदा संसदेने केलेला आहे व तो देशातील सर्वांना बंधनकारक असेल असे अमित शहांनी स्पष्ट केले आहे. नवीन सुधारणा पूर्वलक्षी प्रभावाने असू नये, मशीद-दर्गा-मुस्लीम धार्मिक स्थळांमध्ये सरकारने हस्तक्षेप करू नये व जमीन हा विषय राज्यांचा असल्याने राज्यांना विश्वासात घेण्यात यावे, अशा सूचना चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसम व नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेड या दोन्ही मित्र पक्षांनी सरकारकडे केल्या व त्याला सरकारने सहमती दर्शवली आहे. मग वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध कशासाठी? वक्फ सुधारणा विधेयक हे मुस्लीम विरोधी आहे, मुस्लिमांना दुय्यम नागरिकत्व देणारे आहे, भाजपाला देशाचे विभाजन करायचे आहे असे सांगत असदुद्दीने ओवेसी यांनी विधेयकाची प्रत लोकसभेत चर्चेच्या दरम्यान सभागृहातच फाडली, ही त्यांची टोकाची भूमिका म्हटली पाहिजे. असदुद्दीन सारखे नेते मुस्लीम समाजात गैसमज पसरवतात, त्यांच्यात असंतोष निर्माण व्हावा असा प्रयत्न करतात, हे देशाला घातक आहे. अशा प्रवृत्तींचा सरकारने वेळीच बंदोबस्त केला पाहिजे.

# मेकॉलेच्या पिलावळीची अस्वस्थता !



महात्मा गांधींनी इंग्रजांना ठणकावून सांगितले होते. There was beautiful tree of education in our country, you British destroyed it. (आमच्या देशात शिक्षणाचे सुंदर झाड होते, ते तुम्ही इंग्रजांनी नष्ट केले.) ही घटना स्वातंत्र्य पूर्व काळातील! यानंतर धर्मपाल यांनी ब्रिटिश गॅझेटमधले कागदपत्र शोधून ब्रिटिश पूर्व काळातील भारतीय शिक्षण व्यवस्था हे पुस्तक 'ब्युटिफुल ट्री' या नावानेच प्रकाशित केले.

या पुस्तकात वर्णन केलेली शिक्षण व्यवस्था ही भारतीय शिक्षण पद्धतीबद्दल ब्रिटिशांनी निर्माण केलेले अनेक खोटे विमर्श खोडून काढणारी ठरली. सर्वांना शिक्षण, सर्वसमावेशक शिक्षण, त्यातील ज्ञान आणि विज्ञान, जीवन शास्त्र, गुरुकुल पद्धत, संस्कृत प्रसार या सर्व गोष्टींबद्दल आश्चर्यकारक खुलासे त्यात सापडले.

भारत नावाच्या प्राचीन राष्ट्राची पाळेमुळे ज्यात खोलवर रुजलेली होती, येथील जीवनमूल्ये ज्यात समाविष्ट होती, येथील ज्ञान परंपरेचे ज्यात वर्णन होते, ज्यात पर्यावरणाची सूत्रे समाविष्ट होती आणि एक उत्तम माणूस घडवण्याची क्षमता असलेली ही शिक्षण पद्धती होती. अर्थात दीर्घकाळ सत्ता राबवण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या ब्रिटिशांनी आपल्या स्वप्नपूर्तीसाठी प्रथम आघात केला तो येथील शिक्षण पद्धतीवर! मेकॉलेने मांडलेल्या सूत्रानुसार त्यांनी काळा इंग्रज घडवायला सुरुवात केली. हळूहळू या शिक्षण व्यवस्थेने आमच्या मनाचा ताबा घेतला आणि आम्ही मानसिक गुलाम बनत गेलो. इंग्रजी भाषेला वाघिणीचे दूध म्हणण्या इतकी आमची मानसिकता झाली. त्यातून झालेले मानसिक आघात दीर्घकालीन होते. त्यापूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी या विचाराने जगणारा आमचा समाज उत्तम नोकरी म्हणू लागला. कनिष्ठ शेती म्हणू लागला आणि आमची व्यवसायाभिमुख, ग्राम केंद्रीत अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली. जागतिक बाजारपेठेत सर्वात जास्त निर्यात करणारा देश, सर्वात जास्त GDP असणारा देश, सर्वात जास्त उत्पादने निर्माण करणारा देश हळूहळू ब्रिटिश लोकांची चाकरी करणाऱ्या बाबूंचा देश बनला.

स्वहरवलेल्या या देशात स्वातंत्र्याची चळवळ ज्या चतुःसूत्रीवर लोकमान्य टिळकांनी उभी केली त्यातील मुख्य सूत्र राष्ट्रीय शिक्षण होते. कारण मेकॉलेप्रणीत ब्रिटिश शिक्षण व्यवस्था ही मानसिक गुलामगिरी शिवाय काहीच निर्माण करत नव्हती. हे सगळे आमच्या देशात आधुनिक शिक्षण या नावाखाली ब्रिटिशांनी चालू केलेला गारुडी खेळ होता. खोटा इतिहास, पराभवाचा इतिहास, चुकीचा भूगोल, राष्ट्र आणि धर्म या शब्दांच्या बद्दल चुकीच्या धारणा आणि उज्ज्वल सांस्कृतिक परंपरांच्याबद्दल कमालीची घृणा अर्थात या सगळ्यांतून स्वचा विसर आणि धार्मिक, अध्यात्मिक तसेच कौटुंबिक व्यवस्थांची मोडतोड ही या शिक्षण पद्धतीची देणगी होती.

देशाच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेत अडथळा बनलेली ही शिक्षण पद्धती ब्रिटिश गेल्यावर हद्दपार होणे आवश्यक होती. पण ब्रिटिश गेले तरी त्यांचे पुत्र येथे होतेच. त्यांच्या या पुत्रांनी येथील राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेचा ताबा घेतला आणि देशाचे स्वातंत्र्य केवळ (ट्रान्स्फर ऑफ पॉवर) सत्तांतर ठरले. मानसिक स्वातंत्र्यापासून आम्ही कोसो दूर राहिलो. याचा परिणाम म्हणून देशाच्या भूभागात हजार वर्षांच्या परकीय गुलामगिरीच्या खुणा तशाच अस्तित्वात होत्या. त्या आम्हाला आठवण करून देत होत्या तुमचा इतिहास गुलामगिरीचा आहे. पराभवाचा आहे. यातून अनेक सिद्धांताची मांडणी केली गेली आणि खंडित स्वातंत्र्याच्या मुळावर घाव घालण्याची प्रक्रिया सुरू झाली. आर्य बाहेरून आले या सिद्धांताची मांडणी करून उत्तर/दक्षिण किंवा आर्य/ द्रविड वाद निर्माण केले गेले. शहरवासी / मूलनिवासी हा वाद रंगवला गेला. हिंदू आणि शीख, बौद्ध, जैन यांना वेगळे पाडण्याचे प्रयत्न सुरू झाले. खलिस्तानची मागणी याचाच भाग होता आणि दक्षिणेत निर्माण केली जाणारी अस्मिता किंवा भाषेचा संघर्ष असो शिक्षणातून निर्माण केलेल्या विमर्श प्रक्रियेचा हा परिणाम होता हे निश्चित.



**रवींद्र मुळे**
अहिल्या नगर

नेशन इन मेकिंग नावाखाली या सनातन राष्ट्राची सांस्कृतिक ओळख संपवण्याचे स्वातंत्र्य पूर्व काळात ब्रिटिशांनी आखलेले शिक्षणाच्या माध्यमातून कारस्थान दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर काळे मेकॉले पुत्र आणि नव्याने या टोळीत सामील झालेले मार्क्स पुत्र ह्यांनी गतीने पुढे नेले. या व्यवस्थेतून देशाला मिळालेले शिक्षण मंत्री तसेच होते त्यातून JNU सारखे देशाच्या एकात्मतेवर बाधा आणणारे विद्यापीठे राष्ट्रविरोधी चळवळीची केंद्र बनत गेली. या शिक्षणाने आमच्या समाजाला मुघलवंश पाठ झाले. या शिक्षणाने आम्हाला व्हॉइसरॉय सगळे पाठ झाले. पण राणा संग, पृथ्वीराज, राणा प्रताप, छत्रपती शिवराय, कृष्णदेवराय ही नावे, त्यांचा पराक्रम खचितच माहीत झाले. व्हिक्टोरिया राणी लक्षात राहिली, राणीचा बाग माहीत झाला पण 'राष्ट्रमाता जिजाबाई आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विस्मरणात गेल्या. या शिक्षणाने आमच्या क्रांतिकारकांचा पराक्रम एका पानात संपवला पण ह्यूम साहेबाने स्थापन केलेला काँग्रेसचा इतिहास मात्र पानोपानी आम्हाला वाचायला लावला. या शिक्षणाने प्रशासकीय व्यवस्थेत वाईन पिण्याची पद्धती प्रशिक्षणात तशीच ठेवली पण आम्ही जनतेचे आता सेवक आहोत आता ब्रिटिश राज्याचे प्रतिनिधी नाहीत ही भावना निर्माण नाही केली. फक्त ICS हे नाव बदलून IAS नाव इतकंच बदलले. मी येथे असा भारतीय माणूस तयार करेल जो रंगाने काळा पण विचार, आचरणाने इंग्रज असेल या मेकॉले धोरणाची अंमलबजावणी स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा अधिक गतीने 'मौलाना आझाद ते नुरूल हसन' या शिक्षण मंत्र्यांनी केली. नियतीशी करार केलेले आमचे पहिले पंतप्रधान हे या सगळ्या धोरणाचे प्रणेते होते तर त्यांची कन्या स्वतःच्या सरकारला वाचवण्यासाठी डाव्या मंडळींबरोबर राजकीय करार करताना आमच्या शिक्षणाच्या सत्त्वाचा बळी देत होती.

२०१४ साली मोदी सरकार आले अन् यात बदल घडू लागले. सकस राष्ट्रीय शिक्षण, उच्च सांस्कृतिक मूल्ये, मातृभाषेचा आग्रह, आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करताना आपल्या जुन्या परंपरांमधील विज्ञान आणि पर्यावरण शास्त्र तसेच आमचा हजार वर्षांच्या तुलनेने १०,००० वर्षे जुना (विजिगीषु) इतिहास निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू झाला. याचे एकत्रित सूत्र रूप म्हणजे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण होय. पण ज्यांना हे धोरण त्यांच्या राजकीय दुकानदारीवर आलेले संकट वाटते, ज्यांचे बोलावते धनी हे अजूनही परकीय आहेत, ज्यांचा या मातीतील संस्कृतीशी काही संबंध नाही ज्यांना मातृभाषा म्हणून एकही भारतीय भाषा सांगता येणार नाही त्यांनी शिक्षणाचे भगवे करण नावाची कोल्हेकुई सुरू केली.

देशात कुठेही राष्ट्रीय भावना विकसित व्हायला सुरुवात झाली, समाज जागृत होतो आहे असे दिसले की, भारतातील एक राजकीय नेत्यांची टोळी, विचारवंत मंडळींचा एक गट, काही ठरावीक परदेशी धार्जिणे प्रसारमाध्यमे धर्मनिरपेक्षतेची बांग द्यायला सुरुवात करतात. त्यातूनच सोनिया गांधी नामक काँग्रेसी नेतृत्वाने पत्राच्या उपद्व्यापातून थेट राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा संबंध संघराज्य पद्धतीशी जोडला आहे. स्वतःचे किंवा मुलाचे नेमके काय आणि किती तसेच कुठे शिक्षण झाले याचा पत्ता नसलेली ही मंडळी आपल्या राजकीय स्वार्थासाठी आणि आपल्या परदेशी बसलेल्या सॅम पित्रोदा नामक आणि तत्सम काही मंडळींच्या प्रेरणेने देशात नवीन शैक्षणिक धोरणातून होऊ घातलेल्या आत्मनिर्भर भारताच्या पायाला कुठे तरी अडथळा निर्माण करण्याचा भारत घातकी प्रयत्न करत आहेत याचा जेवढा निषेध करू तेवढा थोडा आहे. मदरशांना अनुदान देताना तेथे दिल्या जाणाऱ्या जिहादी शिक्षणाबद्दल कधी हे बोलणार नाहीत. कॉन्व्हेन्ट नावाच्या प्रयोगातून गेले १००/१५० वर्षे आमच्या हिंदू समाजातील पिढ्यांचे अहिंदूकरण याला यांची मूक संमती मिळणार पण कुठे तरी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून भारताची सांस्कृतिक अवधारणा सांगण्याचा प्रयत्न सुरू झाला की हे भगवेकरण म्हणून बोंब मारणार.

मुरली मनोहर जोशी यांच्या काळात या सगळ्या मंडळींनी हेच उद्योग केले. दुर्दैवाने अटलजी सरकार पडले आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रक्रिया खंडित झाली. यूपीए काळात सर्वच क्षेत्रात पिछेहाट झाली त्यात शिक्षणातील मिशनरी आणि डावा अजेंडा पुढे नेण्यात मेकॉले आणि मार्क्स पुत्र आघाडीवर होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जशी पुढे जाईल तशी ही मंडळी भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करतील अशा वेळी शिक्षणातील राजकारण हद्दपार करून पुढील पिढ्या घडवणाऱ्या शिक्षणासाठी शिक्षण क्षेत्रातील सर्व मान्यवरांनी सज्ज, सजग आणि जागृत राहणे गरजेचे आहे. विकसित भारताच्या आकांक्षांना रोखून धरणारे सोरासप्रणीत नव वसाहतवादी पुन्हा नवे मेकॉले जन्माला घालण्यास सिद्ध झाले आहेत. त्याची पिलावळ त्यासाठीच प्रयत्नशील आहे.

# लाभांश आणि मूल्यवृद्धीद्वारे उत्पन्न वाढ

आपल्या वाजवी इच्छा-आकांक्षा लवकरात लवकर पूर्ण व्हाव्यात आणि आपण आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे यासाठी गुंतवणूक करावी लागते. ती करण्यासाठी काही रक्कम प्रयत्नपूर्वक बाजूला ठेवावी लागते. ती पुरेशी नसेल तर उत्पन्न कसे वाढेल याचे मार्ग शोधावे लागतात. आपल्यासारखेच आपल्या देशाच्या विकासकामासाठी सरकारला पैसे लागतात. कर हे सरकारच्या उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे. वेगवेगळ्या मार्गाने अधिकाधिक कर कसा गोळा होईल हे सरकार पहात असते. त्यातील काही कर सरसकट सर्वांना द्यावे लागतात (उदा. जीएसटी) तर काही पगार किंवा व्यवसायाच्या उत्पन्नावर (उदा.आयकर) द्यावे लागतात. काही कर हे विशेष कर म्हणता येतील. (उदा. भांडवली नफ्यावरील कर, आयात निर्यातीवरील कर) आपल्या सरकारचा अर्थसंकल्प तुटीचा आहे. ही तूट भरून काढण्यासाठी कर्ज घ्यावे लागते, त्यावर व्याज द्यावे लागते. कमी प्रमाणात चलन निर्मिती करून त्याची तोंडमिळवणी करावी लागते. त्यामुळे सरकारी खर्चात वाढ होते आणि चलनाचे मूल्य कमी होते. पर्यायाने महागाईत वाढ होते. आपल्या देशात लोकांच्या उत्पन्नात प्रचंड तफावत आहे. ९०% संपत्ती १०% लोकांकडे एकवटली असल्याने अनेक लोकांना आपल्या किमान गरजा पूर्ण करता येत नाहीत. अशा लोकांसाठी सरकारी योजना आहेत. तरीही अशी अनेक कुटुंबे आहेत जी आपल्या गरजा कशाबशा भागवत असतात. याहून थोडा वरचा स्तर असलेले लोक थोड्या वाढलेल्या उत्पन्नावर आयकर देत होते. खरं तर या वर्गाने त्यांच्या अडीअडचणीसाठी थोडी गुंतवणूक करणे आवश्यक होते.





**उदय पिंगळे**
मुंबई ग्राहक पंचायत

कारण कोणतेही असेना यावर्षी आयकर मर्यादेत नवीन पद्धतीने मोजणी केल्यास प्रत्येक स्तरावर भरीव वाढ तसेच काही अटी पूर्ण करणाऱ्या ₹ १२ लाखांच्या आत करपात्र उत्पन्न असलेल्याना आयकर सवलतीमुळे कर द्यावा लागणार नसल्याने हा वर्ग अधिक खर्च करू शकेल, त्याचप्रमाणे गुंतवणूकही करू शकणार आहे. ९०% व्यक्तींचे उत्पन्न या मर्यादेत असल्याने आता त्यांना आयकर द्यावा लागणार नाही. टीडीएस आणि टीसीएस मर्यादा वाढल्या आहेत. याचा मागोवा घेण्याच्या हेतूने गेल्या वर्षी आयकर विवरणपत्र ज्यांनी भरली त्या सर्व करदात्यांचा तपशील उपलब्ध झाला आहे. ही आकडेवारी ३१ मे २०२४ पर्यंत विवरणपत्र दाखल केलेल्यांची असून त्यातून मिळालेली महत्त्वाची माहिती अशी की, विवरण पत्र भरणाऱ्या करदात्यांची संख्या ७,९७,१२,१४५ आहे. ७२% लोकांनी नवीन करमोजणी पद्धतीचा स्वीकार केला आहे. ज्यांचा आर्थिक स्तर एकदम कमी त्यांना गुंतवणूक शक्यच नाही आणि ज्यांचा आर्थिक स्तर एकदम वरचा आहे त्याना असंख्य गुंतवणूक पर्याय आहेत. आता १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असल्यास कर बसणार नसल्याने एक मोठा वर्ग आयकरापासून मुक्त होईल. करवाढीच्या प्रत्येक टप्प्यात फेररचना झाल्याने सर्वच करदात्यांचा एकंदर कर बऱ्यापैकी कमी होणार आहे. यातील अनेक जण वाचलेला कर खर्च करतील, तर काहीजण बचत आणि त्यातून गुंतवणूक करू शकतील. या गुंतवणुकीतून आपल्याला 'वाजवी' लाभ मिळावा अशी अपेक्षा असणे साहजिक आहे. 'वाजवी' हा सापेक्ष शब्द असला तरी मध्यम उत्पन्न असलेल्या व्यक्तींनी महागाईवर मात करेल असा परतावा मिळू शकेल आणि रक्कमही सुरक्षित राहील असा एक उत्तम पर्याय म्हणजे शक्य असेल त्या पद्धतीने टप्याटप्याने लाभांश (डिव्हिडंड) देणारे असे शेअर्स घ्यावेत की त्यातून मिळणारा परतावा बँकेत पैसे ठेवले तर मिळणाऱ्या रकमेच्या आसपास असेल. भविष्यात त्या शेअर्सच्या भावात वाढ झाली की भांडवल वृद्धी होईल आणि कमी जोखीम घेऊन बऱ्यापैकी परतावा मिळेल. ₹ बारा लाखांपर्यंत उत्पन्नावर कर नाही आणि दरवर्षी ₹ एक लाख पंचवीस हजारांचा करमुक्त दीर्घकालीन भांडवली नफा या दोन्हींचा लाभ घेता येईल असे नियोजन करता येईल. महागाईशी निगडित पेन्शन न मिळणारे ज्येष्ठ नागरिकही आपली निवृत्तीनंतर मिळणारी रक्कम प्रथम स्थिर उत्पन्न देणाऱ्या वरिष्ठ नागरिक बचत योजनेत (SCSS सध्याचा व्याजदर ८.२%), रिझर्व्ह बँकेच्या बदलत्या व्याजदराच्या रोख्यांमध्ये गुंतवून (RBI FRB सध्याचा व्याजदर ८.०५%) निश्चिन्त राहून अधिकची रक्कम अशा शेअर्समध्ये गुंतवू शकतात. अनेक ब्लू चिप कंपन्यांचे भाव कायमच जास्त असून त्यातून मिळणारा लाभांश परतावा नगण्य असल्याने या गुंतवणूकदार वर्गासाठी त्यांचा विचार जाणीवपूर्वक केला नाही.

स्क्रीनर, मनीकंट्रोल, इटी मनी यांसारख्या संकेतस्थळावरून ५% ते १२% लाभांश परतावा मिळणारे शेअर्स शोधल्यास त्यात खनिजे, तेल शुद्धीकरण, नैसर्गिक वायू क्षेत्रातील कंपन्या आहेत, तर २% ते ४% लाभांश परतावा देणाऱ्या यादीत ऊर्जा क्षेत्रातील कंपन्या आहेत. त्या सरकारी क्षेत्रातील उत्तम कामगिरी करणाऱ्या कंपन्या असून त्यांचा गेल्या ५२ आठवड्यांतील सर्वाधिक भाव आणि सर्वात कमी भाव यात ५०% हून जास्त फरक आहे. फारसे कष्ट न घेता लाभांश घेऊन भाव वर्षभरात १५ ते २०% वर गेल्यास भांडवली नफा मिळवता येणे शक्य आहे. त्यांनी आपल्या भागधारकांना वेळोवेळी बोनस शेअर्सही दिले आहेत. सुरक्षित गुंतवणुकीचे हे एक साधन होऊ शकते. या दृष्टीने आपल्या आर्थिक सल्लागाराशी चर्चा करावी. सध्या या सर्व कंपन्या त्याच्या ५२ आठवड्यांतील सर्वात कमी भावाच्या जवळपास मिळत असल्याने, येथून त्यांचे भाव खाली जाण्याची शक्यता बरीच कमी आणि वाढण्याची शक्यता बरीच अधिक आहे. याचा विचार करून आपल्या गुंतवणूक सल्लागाराची मदत घेऊन यातील जोखीम समजून घेऊन गुंतवणूक करता येईल.

mgpshikshan@gmail.com

## राशिभविष्य

शुक्रवार, ०४ एप्रिल २०२५

### ।। पंचांग ।।

आज मिती चैत्र शुद्ध तृतीया शके १९४७. चंद्र नक्षत्र भरणी. योग विष्कंभ. चंद्र राशी मेष भारतीय सौर १४ चैत्र शके १९४७. शुक्रवार दिनांक ४ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.३०, मुंबईचा चंद्रोदय ६.२६, मुंबईचा सूर्यास्त ६.५३, मुंबईचा चंद्रास्त ९.४१, राहू काळ ८.०३ ते ९.३६, आयंबिल ओली प्रारंभ-जैन, शुभ दिवस.

### ।। भविष्य ।।

**मेष** : व्यवसाय-धंद्यातील परिस्थिती चांगली राहील.

**वृषभ** : व्यक्तिगत भाग्योदय होतील.

**मिथुन** : नोकरीमध्ये अनुकूल परिस्थिती राहील.

**कर्क** : आपल्या कार्यक्षेत्रात आपल्या क्षमतेचा ही विचार करा.

**सिंह** : सकारात्मक बाजूकडे अधिक भर द्या.

**कन्या** : आरोग्याकडे लक्ष द्या.

**तूळ** : हाती घेतलेल्या कामात मनाप्रमाणे यश मिळेल.

**वृश्चिक** : इतरांच्या मताला उचित प्राधान्य द्या.

**धनू** : काही अप्रिय निर्णय मनाविरुद्ध स्वीकारावे लागतील.

**मकर** : रोजच्या कामाला विलंब लागू शकतो.

**कुंभ** : नियोजन बदलावे लागेल.

**मीन** : आपली मते इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका.

## जनसंवाद

### छोटे उपक्रम राबवणे आवश्यक...

जागतिक पातळीवर होणाऱ्या घडामोडी हवामान बदलाचे परिणाम रोज दिसत असताना याबाबत निसर्ग संरक्षण संवर्धनसंदर्भात योग्य भूमिका घेऊन वैयक्तिक, कौटुंबिक पातळीवर छोटे उपक्रम करणे आवश्यक वाटते. यातूनच गुढीपाडव्यापासून सुरू झालेले पुढील वर्ष अनेक प्रकारे चांगले असेल असे वाटते. सरत्या वर्षाला निरोप देताना आयुष्यातील एक वर्ष कमी झाले याची जाणीव असावी.

**- प्र. मु. काळे,** सातपूर, नाशिक

### रामनवमी विशेष

श्रीविष्णूचा सातवा अवतार असलेल्या श्रीरामाच्या जन्मानिमित्त रामनवमीचा उत्सव साजरा केला जातो. श्रीराम मंदिरामधून चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवस हा उत्सव चालतो. यावेळी रामायण या ग्रंथाचे पारायण, श्रीरामाचे कथा, कीर्तन, रामलीला, राममूर्तीला विविध शृंगार करणे असे कार्यक्रम आयोजित केले जातात. नवव्या दिवशी म्हणजे रामनवमीच्या दिवशी रामजन्माचे कीर्तन असते. मध्यान्ह काळी एका नारळाला बाळाची वस्त्रे घालून सजवले जाते. तो नारळ पाळण्यात ठेवला जातो. काही ठिकाणी नारळाऐवजी श्रीरामाची मूर्ती देखील पाळण्यामध्ये ठेवली जाते. त्यानंतर श्रीरामाचा पाळणा म्हणतात. फुले आणि गुलाल उधळून श्रीरामाच्या मूर्तीचे पूजन केले जाते. प्रसाद म्हणून सुंठवडा त्याचबरोबर महाप्रसाद दिला जातो.

**- शंकर पवार,** सातारा

### युनूस यांची नसती उठाठेव

बांगलादेश सरकारचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस हे चारदिवसीय चीनच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी चीनला खूश करण्याचा नादात भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले आहे. या दौऱ्यात त्यांनी म्हटले आहे की, भारताच्या पूर्वोत्तर राज्यांना समुद्र लागून नाही. ही राज्ये पूर्णपणे जमिनीनी वेढलेली असल्याने चीनने या संधीचा फायदा घेऊन आपला प्रभाव वाढवावा. हे वक्तव्य करून त्यांनी एकप्रकारे चीनला भारताच्या ईशान्येकडील राज्यावर आक्रमण करावे असे चिथावले आहे. मोहंमद युनूस यांचे हे वक्तव्य अतिशय आक्षेपार्ह आणि निषेधार्ह आहे. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे भारताला घेराव घालण्यासाठी चीनला आव्हान करणारे आहे. मोहंमद युनूस यांचे हे चिथावणीखोर वक्तव्य भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारेच आहे. ईशान्य भारताच्या सुरक्षिततेसाठी बांगलादेश सरकारचा हा दृष्टिकोन अत्यंत धोकादायक आहे. भारत सरकारने मोहंमद युनूस यांच्या या वक्तव्याची कडक शब्दांत निंदा करायला हवी. ज्या बांगलादेशसारखा देश ज्याच्या स्वातंत्र्याला भारताने मदत केली, तोच देश आता भारताच्या विरोधात जात आहे. इतकेच नाही तर थेट भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे हे दुर्दैवी आहे. याला आळा बसायला हवा. त्यासाठी बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यायला हवी. बांगलादेशने त्यांची ही नसती उठाठेव बंद केली नाही तर भारत त्यांना त्यांची जागा दाखवून देईल असा इशाराच भारताने बांगलादेशला द्यायला हवा.

**- श्याम ठाणेदार,** दौंड, पुणे

### मी हिंदुत्व सोडले नाही...

मी हिंदुत्व सोडले नाही याबाबतीत एक उदाहरण दाखवून द्या मी घरी बसेन, तोंड दाखविणार नाही असे म्हणणारे उद्धव ठाकरे आता कोणता निर्णय घेणार? जय श्रीराम म्हणणाऱ्यांना उन्माद चढला आहे, तू तर राहशील नाहीतर मी तरी राहीन, जय श्रीराम म्हणणे याला मी हरामखोरपणा म्हणतो, वक्फ बोर्डाच्या कमिटीत समर्थन करणे, आपल्या झेंड्यातील हिरवा रंग काढून दाखवा, मुस्लीम चर्चेत हिंदूंना वाद घालायचा असेल तर बाहेर जा सांगणे, मुस्लिमांच्या मतांमुळेच माझा विजय झाला, वक्फच्या जमिनीबाबत आम्ही वेडेवाकडे होऊ देणार नाही, वक्फ संशोधनाचे ओवेसींनी बिलाची प्रत फाडल्यावर कोणताही आक्षेप न घेणे, हे सर्व बघितल्यावर आणि २८८ विरुद्ध २३२ मते पाहिल्यावर तरी उद्धवजी घरी बसणार की तोंड दाखविणार नाहीत, हा सुद्धा जनतेसमोर मोठा प्रश्न उभा राहणार यात संदेह नाही कारण 'मी हिंदुत्व सोडले नाही.'

**- अमोल करकरे,** खेड - रत्नागिरी

### पादचाऱ्यांना स्कायवॉक नको, पदपथ हवेत !

दहिसर पश्चिमेला रेल्वे स्थानकापासून ते विठ्ठल मंदिरपर्यंतच्या मुख्य समांतर रस्त्यावर असलेल्या स्कायवॉकवरून रेल्वे प्रवाशांची-नागरिकांची वर्दळ नगण्य असल्याने कुचकामी तर ठरत आहेच पण यांचे अंतरा-अंतरावरचे ( विशेषतः उत्तर दिशेला विठ्ठल मंदिर नजीक) सिमेंट पिलर्स अडचणीचे ठरत आहेत. या रस्त्यावर दुतर्फा दैनंदिन लागणाऱ्या वस्तू, खाद्यपदार्थ, औषधे आदींची दुकाने आहेत. यातील काही दुकानांपुढे नागरिकांना चालण्यासाठी पदपथही नाहीत, तर काही चिंचोळे आहेत. शिवाय भरीला या मार्गावर कुठेना कुठे काँक्रिटीकरण, पाणी, वीज, गॅस पुरवठा कामासाठी खोदाई सुरू असते. या रेल्वेला समांतर अशा मार्गावरून बसेस, रिक्षांसह सर्व प्रकारच्या वाहनांची अमाप वर्दळ असल्याने या मार्गावरून नागरिकांना, विशेषतः ज्येष्ठांना जीव मुठीत धरून चालावे तर लागतेच, शिवाय हा रस्ता क्रॉस करताना (विशिष्ट वळण ठिकाणी) या स्कायवॉकच्या विशाल (पिलर्स) खांबांआडून-पलीकडून ये-जा करणारी वाहने दिसून येत नसल्याने रस्ता पार करणे सर्वांनाच दिव्य ठरते.

**- किरण प्र. चौधरी,** दहिसर, मुंबई

### अशाही एका निर्णयाची अपेक्षा !

एक राज्य, एक गणवेश या संकल्पनेनुसार शालेय शिक्षण मंडळाने ज्या संस्थांना गणवेशाची कामे दिली होती त्या वेळेत पूर्ण करू शकल्या नाहीत. अथवा याबाबत खूपच दिरंगाई झाली हे लक्षात येताच शालेय शिक्षण मंडळाने गणवेशबाबतचे सर्वाधिकार पुनश्च शाळा व्यवस्थापन समितीकडे सुपूर्त केले. मंडळाचा हा निर्णय योग्य आणि वेळेत घेतल्याचे समाधान आहे. जेणेकरून यापुढे विद्यार्थ्यांना वेळीच गणवेश मिळतील, अशी आशा करू या असो. याच पार्श्वभूमीवर, शिक्षकांना देण्यात येणारी निवडणुकीची, अन्य शासकीय उपक्रमांची कामे, विविध शासकीय योजनांची कामे आदी. थोडक्यात काय, शिक्षकांना सरकारी कामात लावल्याने साहजिकच विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देणे जमत नाही, शिकवणीकडे दुर्लक्ष होते हेही नाकारता येत नाही आणि म्हणूनच अशी शासकीय शैक्षणिक बाह्य कामे शालेय शिक्षण मंडळाने अन्य संस्था, गरजू युवा पिढी, सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक यांना दिल्यास अशांना रोजगार उपलब्ध होईल आणि शिक्षकांनाही विद्यार्थ्यांसाठी अधिक वेळ देता येईल, देऊ शकतील.

**- विश्वनाथ पंडित,** ठाणे

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी



## रोटरी क्लबच्या एक्सेलेन्सी ॲवॉर्डने अनिल खेडेकर सन्मानित

**भाईंदर :** पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रोटरी क्लबने प्रहारचे वार्ताहर अनिल खेडेकर यांना एक्सेलेन्सी ॲवॉर्डने सन्मानित केले आहे. रोटरी क्लब ऑफ मीरा रोडचा ३० वा वर्धापन दिन क्लबचे अध्यक्ष आनंद भटकळ यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर चेतन देसाई आणि रोटरियन स्टेफनी उर्चिक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रफुल्ल शर्मा आणि राजन दुआ यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. त्यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना एक्सेलेन्सी ॲवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. त्यात वैद्यकीय क्षेत्रात डॉ. भास्कर शेट्टी, सामाजिक सेवेसाठी श्रीविद्या महेश,करमणूक क्षेत्रात सम्राट गिल, समुपदेशक खादिजा मोटारवाला, उगवता युवा लेखक पार्थ दुबे तसेच पत्रकारिता क्षेत्रासाठी अनिल खेडेकर यांना सन्मानीत करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन चंद्रहास पालन, हिमांशू तनवर, बाबा सिंह, दीपक चंद्रहास यांनी केले होते.

## वेचक

## रिफा कुवारे या दहा वर्षीय मुलीने केले रोजे पूर्ण



अनेकांकडून शुभेच्छा

**पेण :** रमजान महिना हा मुस्लीम समाजातील पवित्र सण मानला जातो.या महिन्यात अनेक जण रोजे उपवास पकडतात. त्यातच पेण येथील काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष हिद्दायततुल्ला कुवारे यांची नात रिया कुवारे या दहा वर्षीय मुलीने जवळपास एक महिना अन्न पाणी न घेता रोजे उपवास पूर्ण केल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी रिफा हिला शुभेच्छा देण्यासाठी काँग्रेस सरचिटणीस चंद्रकांत पाटील, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, देवेंद्र पाटील, राजा म्हात्रे, अविनाश भोईर, आनंद जाधव, हिना कागदी आदी उपस्थित होते.

## जाखड यांची बदली राज्य सरकारची निष्क्रियता दर्शवते : नोवेल साळवे

**कल्याण :** केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या अचानक बदलीच्या निर्णयामुळे नागरिक चिंतेत पडले आहेत. प्रशासनाच्या फिसकटलेल्या यंत्रणांवर अंकुश आणायचे प्रयत्न करत असताना,जाखड यांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच त्यांची बदली होणे राज्य सरकारची निष्क्रियता दर्शवित असल्याचे मत शरद पवार गटाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले एवढ्या वर्षात प्रथमच केडीएमसीला उत्तम काम करणारी आयएएस महिला आयुक्त लाभली होती. परंतु,महापालिकेला भ्रष्टाचाराचे कीड लागल्याच्या कारणाने आणि प्रत्येक गोष्टीत मोठ्या राजकारणी लोकांच्या हस्तक्षेपामुळे चांगले आयुक्त येथे टिकणे कठीण झाल्याची सर्वसामान्य नागरिकांची भावना आहे.जाखड यांच्यासारखा कर्तव्यदक्ष नवीन आयुक्त महानगरपालिकेत आल्यावर त्यांना त्यांची कामगिरी दाखवण्याची व जनतेची सेवा करण्याची संपूर्ण संधी राज्य सरकारने दिले पाहिजे. याप्रकारे जर मध्येच कुठल्याही आयुक्तांची बदली करण्यात आली तर ते शहराचे विकास आणि नागरिकांची हिताचे काम करू शकत नसल्याचे साळवे म्हणाले.

## महापालिकेने गृहनिर्माण संस्थांवर टाकला मलनिस्सारण जोडणीचा भार

**भाईंदर :** महानगरपालिका सीवरेज प्रणालीला एसटीपी प्लांटशी जोडण्याचे शुल्क २५ हजार रुपये आकारात होती,आता त्याचबरोबर पर्यवेक्षण शुल्क,नळजोडणी तसेच इन्स्टॉलेशनच्या संपूर्ण खर्चाचा भार सुध्दा गृहनिर्माण संस्थांवर टाकला आहे. नागरिकांवर अनावश्यक आर्थिक भार टाकू नये यासाठी भाजपाने आयुक्तांना निवेदन दिले आहे. मीरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अनेक खासगी गृहनिर्माण संस्था आहेत. पूर्वी महानगरपालिकेच्या ठेकेदारांद्वारे या सोसायट्यांच्या सीवरेज प्रणालीला एसटीपी प्लांटशी जोडण्याचे काम केले जात होते,ज्यासाठी २५ हजार रुपये पर्यवेक्षण शुल्क आकारले जात होते. मात्र,अलीकडील धोरणानुसार पर्यवेक्षण शुल्का सोबतच पाइपलाइन आणि इन्स्टॉलेशनचा संपूर्ण खर्च देखील खाजगी सोसायट्यांवर टाकण्यात आला आहे.ज्यामुळे मलनिस्सारण जोडणीच्या कामातील विलंब आणि दुर्लक्षामुळे काही गृहसंस्थांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत आहे. जवळपास ५० टक्के गृहनिर्माण संस्थांनी कोणतेही अतिरिक्त शुल्क न भरता त्यांच्या मलनिस्सारण जोडणीचे काम पूर्ण केले आहे मात्र उर्वरित गृहसस्थांकडून आता या जोडणीसाठी जास्त शुल्क आकारले जात आहे. यामुळे नागरिकांत असंतोष पसरला असल्याने याबाबत पुनर्विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा अशी मागणी भाजपचे विधानसभा क्षेत्र निवडणूक प्रमुख रवी व्यास यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

## मीरा-भाईंदर भाजपा मंडळ सरचिटणीसपदी मोहिल कशाळकर


**भाईंदर :** मीरा-भाईंदर भाजपाच्या नवघर मंडळ सरचिटणीसपदी मोहिल कशाळकर यांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी केली आहे.आगामी महापालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवून भाजपाने मीरा भाईंदरमध्ये युवा पिढीला मुख्य प्रवाहात आणून त्यांनी जनसामान्यांपर्यंत पोहचून कार्य करण्याची रणनीती आखली आहे. त्याचाच एक भाग म्हणून भाजपा मंडळ सरचिटणीस पदी मोहिल कशाळकर या युवकाची नियुक्ती करून त्याच्यावर जबाबदारी सोपविली आहे.जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी जिल्हा कार्यालयात मोहिल याला नियुक्ती पत्र दिले त्यावेळी आमदार नरेंद्र मेहता, माजी नगरसेवक मुन्ना सिंह यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# बँक ठेवीदारांच्या संपूर्ण ठेवीवर १०० टक्के विमा सुरक्षित करा

### खासदार नरेश म्हस्के यांची संसदेत मागणी

**◆ ठाणे (प्रतिनिधी) :**







सध्या भारतातील राष्ट्रीयकृत, खाजगी, परदेशी अथवा सहकारी अशा कोणत्याही बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी या डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन अधिनियम १९६१ द्वारे विम्याने सुरक्षित करण्यात येतात. डीआयसीजीसी कायद्याच्या कलम १६ अन्वये सध्या ठेवीदारांच्या फक्त पाच लाख रुपयेपर्यंतच्या ठेवींनाच विमा संरक्षणाचे कवच आहे. याचाच अर्थ कोणत्याही ठेवीदाराच्या पाच लाख रुपयांहून जास्त असलेल्या ठेवींना विम्याचे संरक्षण नाही. त्यामुळे जर का एखादी बँक डबघाईला आली अथवा बुडीत खात्यात गेली तर ठेवीदारांच्या पाच लाख रुपयांहून जास्त असलेल्या ठेवी मातीमोल ठरतात.अशा आर्थिक अरिष्टामुळे काही ठेवीदारांचा मृत्यू झाल्याच्याही घटना आहेत. तरी बँक ठेवीदारांच्या संपूर्ण ठेवी १०० टक्के विमा सुरक्षित करा व दिवाळखोरीत गेलेल्या बँकांमधील ठेवीदारांना १०० टक्के परतावा द्यावा,अशी जोरदार मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी गुरूवारी संसदेत केली.

देशात सध्या काही राष्ट्रीय असो वा खासगी बँका दिवाळखोरीत किंवा डबघाईला गेलेल्या दिसत आहेत. केंद्राने ग्राहकांच्या आर्थिक संरक्षणासाठी डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन अधिनियम लागू केला आहे. या नियमानुसार हे महामंडळ बँकांकडून संपूर्ण ठेवींच्या रक्कमांवर प्रीमियम वसूल करते. परंतु जेव्हा एखादी बँक डबघाईस येते अथवा बुडीत खात्यात जाते वा दिवाळखोरीत निघते तेव्हा ठेवीदारांना रक्कम द्यायची वेळ आल्यावर प्रति ठेवीदार फक्त पाच लाख रुपये पर्यंतच्याच ठेवींची भरपाई करण्यात येते, ही बाब आक्षेपार्ह आणि खटकणारी असल्याचे खासदार म्हस्के यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

बुडीत खाती अथवा दिवाळीला गेलेल्या बँकेच्या ठेवीदारांना पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी परत केल्यानंतर डीआयसीजीसी या सर्व रक्कमा संबंधित बुडीत खात्यात गेलेल्या बँकेच्या उर्वरीत ठेवी आणि मालमत्तेतून परत वसूल करते. त्यामुळे ज्या ठेवीदारांच्या पाच लाखाहून अधिक ठेवी अशा बँकेत असतील त्यांना त्या नंतर परत मिळण्याची शक्यता आणखीनच दुरावते.त्यामुळे एकीकडे अशा निष्पाप ठेवीदारांना नाहक आर्थिक फटका बसतो आणि दुसरीकडे डीआयसीजीसी सारखे सरकारी महामंडळ एकीकडून प्रीमियम वसूल करते आणि दुसरीकडून परत विम्या पोटी दिलेली रक्कम परत मिळवते आणि लाखो कोटींचा नफा करते. याला विमा योजना कसे म्हणता येईल? ही गंभीर बाब असल्याचे खासदार म्हस्के म्हणाले.

दुर्दैवाने डीआयसीजीसी कायद्यातील तरतुदीच अशा व्यवस्थेला साथ देत आहेत आणि म्हणून या कायद्यातील या ग्राहक हित विरोधी तरतुदींमध्ये रितसर दुरुस्त्या करून सर्व ठेवीदारांच्या सर्व रकमा १०० टक्के विमा सुरक्षित करण्याबाबत केंद्र सरकारने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे,असे खासदार नरेश म्हस्के म्हणाले. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील पीएमसी बँक,सिटी को-ऑपरेटिव्ह बँक आणि आताची न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक या सर्व बँकांतील ठेवीदारांना सरकारने त्यांच्या शंभर टक्के ठेवी परत करणे हे नैतिकतेला धरून असेल कारण डीआयसीजीसीने २०२१पासून या बँकांतील संपूर्ण १०० टक्के ठेवींवर प्रीमियम गोळा केलेला आहे.

त्यामुळे त्यांना केवळ पाच लाख रुपयांच्या ठेवी परत करुन सरकार अथवा महामंडळ आपली जबाबदारी झटकून टाकू शकणार नाही,असेही खासदार म्हस्के म्हणाले.

## केडीएमसीच्या पथकावर रिव्हॉल्वर रोखले

**◆ कल्याण (वार्ताहर) :**



अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिका पथकावर कल्याणजवळील वडवली येथे हल्ला करण्यात आला. हा हल्ला शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक दुर्योधन पाटील, त्याचा मुलगा वैभव पाटील आणि त्यांच्या साथीदारांनी केला असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आहे.

६५ बेकायदा इमारत प्रकरणानंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामांविरोधात कठोर कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. गेल्या तीन महिन्यांत केडीएमसीने अनेक बांधकाम भुईसपाट केली आहेत. कल्याण जवळील वडवली येथे अनधिकृत बांधकाम सुरू असल्याची माहिती कल्याण, डोंबिवली महापालिकेच्या अ प्रभाग कार्यालयातील पथकाला मिळाली होती. या माहितीनुसार,अ प्रभाग क्षेत्र पथक प्रमुख राजेंद्र साळुंखे, अधीक्षक शिरीष गर्गे यांच्यासह आशिष टाक, विलास साळवी, रमेश भाकरे आणि इतर कर्मचारी कारवाई करण्यासाठी त्या ठिकाणी पोहोचले. या अनधिकृत बांधकामाची पाहणी करत असताना त्याच ठिकाणी शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक दुर्योधन पाटील यांचा मुलगा वैभव पाटील आपल्या साथीदारांसह पोहचले.

पाटीलने अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यास कडाडून विरोध केला. अधिकारी, कर्मचाऱ्यांना रिव्हॉल्वरचा धाक दाखवत लाकडी दांडक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी केडीएमसीच्या पथकासोबत असलेल्या वाहनांच्या काचाही फोडल्या. दुर्योधन पाटील यांच्या दहशतीमुळे केडीएमसीचे कर्मचारी अधिकारी यांनी तेथून काढता पाय घेतला. याआधी देखील दुर्योधन पाटील याने केडीएमसीच्या कर्मचाऱ्यांना बांधून ठेवत मारहाण केली होती.

या प्रकरणी अ प्रभाग क्षेत्र पथक प्रमुख राजेंद्र साळुंखे यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करत पुढील तपास सुरू केला आहे. मात्र अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यास गेलेल्या केडीएमसीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना मारहाण झाल्याची घटना घडल्याने, आता केडीएमसी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### अग्निशमन सप्ताहात राबवले जात आहेत विविध उपक्रम

## केडीएमसी अग्निशमन दलाकडून प्रदर्शनाद्वारे जनजागृती

**◆ कल्याण (प्रतिनिधी) :**



सध्या अग्निशमन दलाचा सप्ताह सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून केडीएमसी अग्निशमन दलातर्फे प्रदर्शनाद्वारे जनजागृती केली जात आहे.या प्रदर्शनाला नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. केडीएमसी प्रभारी आयुक्त हर्षल गायकवाड यांनी देखील या प्रदर्शनाला भेट देत या उपक्रमाची आणि अग्निशमन दलाची माहिती घेतली.

दरवर्षी १ एप्रिलपासून संपूर्ण राज्यभरात अग्निशमन सप्ताह साजरा केला जातो.ज्यामध्ये अग्निशमन दलाकडील अत्याधुनिक यंत्रणा-साधन सामुग्री प्रदर्शन,शहरातील सोसायटींमध्ये जाऊन रहिवाशांमध्ये जनजागृती,सायकल रॅली आदी उपक्रमांचा समावेश असल्याची माहिती केडीएसमीचे मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांनी दिली. तसेच याच सप्ताहाचा भाग म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिका अग्निशमन दलाच्या आधारवाडी येथील मुख्यालयात एका प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून येत्या दिवसांत पुढील सर्व अग्निशमन केंद्रांमध्ये अशाच प्रकारचे प्रदर्शन राबवण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

तर अग्निशमन दलाने या प्रदर्शनामध्ये आग लागल्यानंतर ती विझवण्यासाठी,अपघात किंवा मोठी दुर्घटना झाल्यानंतर त्यामध्ये बचाव कार्य करण्यासाठी, इमारतीखाली अडकलेल्या - इमारतीच्या लिफ्टमध्ये कोणी अडकल्यानंतर संबंधित व्यक्तीला बाहेर काढण्यासाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रणा आणि साधनसामग्री ठेवण्यात आली आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी अनेक नागरिक तसेच परिसरातील नामांकित शाळांचे विद्यार्थी येत असून उपस्थित अग्निशमन कर्मचाऱ्यांकडून त्यांना त्याबाबत माहितीही दिली जात आहे.

दरम्यान या अग्निशमन सप्ताहाचा एक भाग म्हणून येत्या रविवारी ६ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता अग्निशमन सुरक्षा सायकल रॅलीचेही आयोजन करण्यात आले आहे.आधारवाडी येथील मुख्य अग्निशमन केंद्रापासून ही सायकल रॅली निघणार असून दुर्गाडी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मोहम्मद अली रोड,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानमार्गे मुरबाड रोड, प्रेम ऑटो,बिर्ला कॉलेज,खडकपाडा,आधारवाडी चौक मार्गे पुन्हा मुख्य अग्निशमन केंद्रात त्याचा समारोप होणार असल्याचेही नामदेव चौधरी यांनी सांगितले.

## 'स्थानिक भूमिपुत्र व जमीन मालकांच्या हक्कांचे संरक्षण करणार'



**◆ शहापूर (वार्ताहर):**

शहापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार दौलत दरोडा यांच्या पुढाकाराने,बुधवारी राज्याचे वनमंत्री गणेशजी नाईक यांच्या दालनात तानसा इको सेन्सिटिव्ह झोन संदर्भात महत्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत वन खात्याचे वरिष्ठ अधिकारी आणि बाधित जमीन मालक उपस्थित होते. यावेळी वनमंत्री गणेश नाईक यांनी बाधित जमीन मालकांचे म्हणणे ऐकून घेतले आणि तेरा महसुली गावांमध्ये शून्य मीटर (रेल्वे लाईनजवळ) आणि इतर भागांमध्ये १०० मीटर बफर झोन ठेवण्याचा कायदेशीर पर्याय तपासण्याचे निर्देश दिले. तसेच,या संदर्भातील सकारात्मक प्रस्ताव १५ दिवसांत केंद्र सरकारकडे पाठवण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीस अवर वन सचिव मिलिंद म्हैसकर, वन अधिकारी शहापूर दिपेश मल्होत्रा तसेच इतर वन विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. या चर्चेदरम्यान आमदार दौलत दरोडा आणि वनमंत्री नाईक यांनी भूमिपुत्र व जमीन मालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची ग्वाही दिली.

## सकल हिंदू समाजाच्या वतीने श्री रामनवमी निमित्ताने शोभायात्रा

**कल्याण :** सकल हिंदू समाजाच्या वतीने कल्याण पूर्वमध्ये श्री रामनवमी निमित्ताने भव्य शोभायात्रा ६ एप्रिल रोजी संध्याकाळी पाच वाजता काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेला कल्याण पूर्व विठ्ठलवाडी बस डेपो पासून सुरुवात होणार असून चक्की नाका येथे समाप्ती होणार आहे.

यावेळी अध्यक्ष हेमंत दरगोडे यांनी सांगितले की,तीन वर्षांपासून आम्ही रामनवमीनिमित्त शोभायात्रा काढत आहोत. यावर्षी देखील हि शोभायात्रा विठ्ठलवाडी बस डेपोपासून सुरू होऊन ते पुढे काटेमानीवली नाका,तिसगाव नाका आणि चक्की नाका गुणगोपाल मंदिर याठिकाणी समाप्ती होणार आहे.

या शोभायात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे यात बहुसंख्येने रामभक्त एकत्र आलेले असतात. संपूर्ण कल्याण पूर्वेतील रामभक्तांना एकत्र आणणार हे व्यासपीठ आहे.

## दिवा आणि मुंब्रा भागात अनधिकृत नळ जोडण्याविरोधातील कारवाई सुरूच

**◆ ठाणे (प्रतिनिधी) :**



दिवा आणि मुंब्रा भागात कारवाईच्या दुसऱ्या दिवशी २७ अनधिकृत नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या. पहिल्या दिवशी २९ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या होत्या. अनधिकृत टँकर भरणाप्रकरणी दोन गुन्हे दाखल झाले आहेत, तसेच अनधिकृत नळ जोडणीबाबत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने दिवा आणि मुंब्रा या भागातील अनधिकृत नळ जोडण्या खंडित करणे, अनधिकृत टँकर भरणा केंद्र काढणे यासाठी विभागनिहाय टीम तयार केल्या आहेत. त्यांनी कारवाईच्या दुसऱ्या दिवशी कल्याण फाटा ते वाय जंक्शन या भागातील १४ अनधिकृत व्यावसायिक (दुकाने, टपऱ्या) नळ जोडण्या खंडित केल्या. तर १० घरगुती अनधिकृत नळजोडण्या खंडित करण्यात आल्या. वाय जंक्शन ते मुंब्रा-ग्लोबल नाला आणि आगासन गाव येथे १३ निवासी अनधिकृत नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या. आगासन गाव येथे ६ नळजोडण्या तर ४ टँकर पॉईट उध्दवस्त करुन ६ पंप जप्त करण्यात आले. त्याचबरोबर,तीन अनधिकृत टॅंकर भरणा केंद्र उद्धस्त करण्यात आले. या कारवाईत पाच पंप जप्त करण्यात आल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली.

आयुक्त सौरभ राव यांनी अनधिकृत नळ जोडण्यांविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार, दिवा-आगासन भागातील अनधिकृत नळ जोडण्या खंडित करण्याची कारवाई सुरू करण्यात आली.

## बदलापुरात गाळ्याच्या भाड्याचा वाद; वडिलांची हत्या

**बदलापूर :** गाळ्याच्या भाड्याच्या वादातून पोटच्या मुलाने वडिलांची धारदार शस्त्राने हत्या केली असल्याची माहिती समोर आली आहे. सदर धक्कादायक घटना बदलापुरात सकाळी आठच्या सुमारास घडली. अनंत कराळे असे मृत व्यक्तीचे नाव असून पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव गणेश कराळे असे आहे.गाळ्याच्या भाड्यावरून मुलगा आणि वडिलांमध्ये असलेल्या वादातून हा प्रकार झाला असल्याची माहिती बदलापूर पश्चिम पोलिसांनी दिली. या प्रकरणी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार बेलवली भागात राहणारे अनंत कराळे यांचे या भागात दोन गाळे आहेत. या गाळ्यांपैकी एकाचे भाडे वडिलांनी आणि दुसऱ्याचे भाडे मुलाने घ्यावे असे ठरले होते. मात्र वडील दोन्ही गाळ्यांचे भाडे घेण्यासाठी जबरदस्ती करत होते. त्यातून गेल्या सात आठ वर्षांपासून अनंत कराळे व त्यांचा मुलगा गणेश यांच्यात वाद होत होते.

## ठाणे महापालिका आयोजित 'गर्भाचे भावविश्व अर्थात वैज्ञानिक गर्भसंस्कार' व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**◆ ठाणे (प्रतिनिधी) :**

नवीन पिढी सक्षम करण्यासाठी पालकत्वही तितकेच सक्षम असणे आवश्यक असते. गरोदरमातांनी केलेल्या विचारांचा परिणाम हा बाळावर होत असतो. यासाठी गर्भवती मातांनी रोज आपल्या बाळाशी संवाद साधावा,आपल्या बाळाला समजत आहे या भावनेने त्याच्याशी बोलत रहावे याचे कळत नकळत परिणाम हे गर्भातील बाळावर होत असल्याचे मनशक्ती केंद्र, लोणावळा येथील जीवनदानी साधक सुहास गुधाटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना नमूद केले.

ठाणे महानगरपालिका आयोजित मनशक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा प्रस्तुत 'गर्भाचे भावविश्व अर्थात वैज्ञानिक गर्भसंस्कार' या विषयावरील मार्गदर्शन कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात गुरुवारी आयोजित करण्यात आले होते. यावेळी उपवैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिताली वाघमारे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. वर्षा ससाणे, मनशक्ती प्रयोग केंद्राचे साधक मनोज पाटील, सुधाकर पाठक, जयप्रकाश वराडकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमास ठाणे महापालिकेतील विविध आरोग्य केंद्रात तपासणीसाठी येणाऱ्या गरोदर मातांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.





गर्भाचे भावविश्व अर्थात वैज्ञानिक गर्भसंस्कार याविषयी मार्गदर्शन करताना वक्ते सुहास गुधाटे यांनी वैज्ञानिक गर्भसंस्कारामध्ये गर्भावस्थेदरम्यान आई आणि तिच्या बाळाच्या शारिरिक,मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या आधारित मार्गदर्शन आणि उपायांचा समावेश असतो, या उपायांमुळे बाळाचा उत्तम विकास आणि आईचे आरोग्य सुधारण्यास मदत होत असल्याचे नमूद केले. आईमध्ये असलेल्या गुणांचा बाळामधील गुणांमध्ये गुणाकार होऊन गुण कसे वाढतील आणि दोष कसे कमी यासाठी गरोदर मातांनी प्रयत्न करावेत. गर्भधारणा ही निसर्गाने दिलेली गोष्ट आहे, त्यामुळे त्याबद्दल मनात कुठलेही भय ठेवू नये. प्रसुती नैसर्गिक होण्यासाठी गरोदर मातांनी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक प्रसूती होईल अशी भावना मनात ठेवावी यासाठी हलकी आसने करावीत. गर्भातील बाळ हे अनेक गोष्टींना प्रतिसाद देत असते, यासाठी गर्भवती मातांनी चांगले संगीत ऐकावे, त्याचा थेट परिणाम हा बाळावर होत असतो. संगीतामुळे बाळाच्या उजव्या मेंदूला चालना मिळते, दोन्ही मेंदूचा समतोल राखल जातो. तसेच संगीत ऐकल्याने आईच्या मनावरचा ताण, चिंता आणि नैराश्य देखील कमी होण्यास मदत होते.

गर्भवती मातांच्या घरातील वातावरण देखील चांगले असणे गरजेचे आहे. भय, राग, धैर्य, शांती हे स्वभावाचे प्रकार आहेत. भय आणि राग हे अंगभूत असतात त्यावर नियंत्रण ठेवावे असेही सुहास गुधाटे यांनी मार्गदर्शन करताना नमूद केले. या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी, आशा वर्कर्स, प्रसाविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### तुटपुंज्या मजुरीत मजुरांची बोळवण

# शेकडो वीटभटटी मालकांची चांदी, पाणी, वीज, महसुलाची चोरी

**◆ मुरबाड (प्रतिनिधी) :**

चोरीची वीज, पाणी, बुडवलेली रॉयल्टी व तुटपुंज्या मजुरीत मिळणारे गरजू आदिवासी मजूर यांमुळे तालुक्यातील शेकडो वीटभट्टी मालकांचे उखळ पांढरे झाले आहेत. तालुक्यात शेकडोच्या संख्येने वीटभट्टया आहेत. गाव तेथे वीटभट्टी अशी परिस्थिती सध्या पाहायला मिळत आहे. सप्टेंबर महिना उजाडला की,या व्यवसायाला सुरुवात होते. पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन शक्यतो, पाण्याच्या ठिकाणी हा कारखाना उभा केला जातो.यातील महत्वाची निकड



म्हणजे वीटा थापणारा कुशल कामगार वर्ग. हा मजूर मालकाने वर्षभरापूर्वीच आगाऊ पैसे देऊन बुक केलेला असतो. शक्यतो विविध वाड्या वस्त्यातील आदिवासी हा या वीटभट्ट्यांवर कुटुंबासह राबत असतो. या व्यवसायाच्या भाषेत याला 'पातला' म्हटले जाते. एक पातला म्हणजे एक कुटुंब.जितकी पातल्यांची संख्या जास्त तितकी वीटभट्टी मोठी. हे पातले अगदी तुटपुंज्या मजुरीत मिळवले जातात.

**पातले अशा पद्धतीने लूबाडणूक करून मिळवले जातात.**

जुन महिन्यापासून शेतीच्या कामांना सुरुवात होते.त्यामुळे आदिवासी मजूराला काम मिळते. गणेशोत्सवा पर्यंत या समाजाच्या हाताला काम मिळते.यानंतर कामे नसतात.त्यामुळे पुढच्या विवंचनेत ही कुटुंबे असता.याच हतबलतेचा फायदा काही वीटभट्टी मालक उचलतात.व अशा कुटुंबांना गणपती सणाआधीच पंधरा वीस हजार रुपये देऊन त्यांना तयार केले जाते. त्यानंतर या सर्व कुटुंबाला तुटपुंज्या रकमेत राबावे लागते.

**वीटभट्टी कामगारांची, कुटुंबाची गैरसोय**

बहुतेक सर्वच ठिकाणी वीटभट्ट्यांवर कुटुंबासहित मजूर राहतात.यात त्यांची लहान मुले असतात.त्यांच्या शाळेची सोय नसते. बालकांना याठिकाणी प्रकल्पाचे कोणतेही लाभ मिळत नाही.स्तनदा, गर्भवती माता या देखील शासनाच्या सोई सुविधांपासून वंचित राहतात. याठिकाणी त्यांना कोणत्याही पायाभूत सुविधा पुरवल्या जात नाहीत.तसेच त्यांची कोणतीही नोंद ठेवली गेलेली नसते.गेली अनेक दशके हा समाज या दुष्टचक्रात अडकला आहे.

## सिडकोच्या द्रोणागिरी अग्निशमन केंद्रासोबत संपर्क साधण्याकरिता नवीन दूरध्वनी क्रमांक जाहीर

**◆ नवी मुंबई ( प्रतिनिधी) :**

सिडकोच्या द्रोणागिरी अग्निशमन केंद्राकडे अत्यावश्यक सेवेसाठी मदत मागण्याकरिता द्रोणागिरी परिक्षेत्रातील रहिवशांकरिता सध्या ०२२-२७२२२१३८ हा एमएटीएनएल दूरध्वनी क्रमांक उपलब्ध असून द्रोणागिरी परिक्षेत्रात अग्निशमन व अन्य अत्यावश्यक सेवांकरिता द्रोणागिरी परिसरातील नागरिक याच क्रमांकांवर संपर्क साधतात. परंतु, सध्या ०२२-२७२२२१३८ हा एमटीएनएल क्रमांक बंद असल्याचे एमटीएनएलतर्फे कळविण्यात आले आहे.

यामुळे या क्रमांकावर कॉल केला असता केवळ रिंग होते, परंतु दूरध्वनी क्रमांक बंद असल्याचा अनुभव नागरिकांना येत आहे. याकरिता द्रोणागिरी परिसरातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सिडकोतर्फे ०२२-६९३६५६०० या नवीन एमएटीएनएल दूरध्वनी क्रमांकासह ८१०४९६१९४१ हा भ्रमणध्वनी क्रमांकदेखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या क्रमांकांवर संपर्क साधून द्रोणागिरी परिसरातील नागरिकांनी अग्निशमन किंवा अत्यावश्यक सेवांकरिता मदत मागावी, असे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे.

# समाजाला खऱ्या अर्थाने चिंतनाची गरज

**जयभिम महोत्सव** | **भिक्खु धम्मशिल थेरोंची धम्मदेसना**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेण्यासाठी खऱ्या अर्थाने चिंतनाची आवश्यकता आहे.त्याशिवाय बाबासाहेब आंबेडकर तुम्हाला समजणार नाहीत.त्यामुळेच समाजाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करावेत.असे विचार पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो यांनी धम्मदेसना कार्यक्रमात व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे शुक्रवार (दि.४) रोजी रात्री ७ वाजता धम्मदेसना आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो, भिक्खु पय्यावर्धन बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पी.व्ही.बनसोडे, प्रमुख पाहुणे म्हणून संदिप उपरे, अमरसिंह ढाका उपस्थित होते.

उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करतांना भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक क्रांती केल्या असून बौद्ध धम्म ही सर्वांत मोठी क्रांती केली. जयंती हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून चळवळीचे ऊर्जा केंद्र आहे. त्यामुळे जयंती नीटपणे समजून घेतली पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचा सूर्य आहेत.या सूर्याने मानवाला मानवाचे अधिकार मिळवून दिले. बाबासाहेबांनी विचारांशी कधीही तडजोड केलेली नाही.असेही भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले. भिक्खु पय्यावर्धन म्हणाले की, बीडच्या जयभिम महोत्सवाने क्रांतीचा दिवा तेवत ठेवला आहे. खरंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा त्याग, समर्पण, विसरता कामा नये. कारण आज आपण जे काही आहोत ती, बाबासाहेबांचीच पुण्याई आहे.असे भिक्खु पय्यावर्धन म्हणाले. या धम्मदेसना व्याख्यानाचे प्रास्ताविक गौतम चोपडे सूत्रसंचलन सुनिल डोंगरे,सचिन वडमारे, आभार ड.राजेश शिंदे यांनी केले.यावेळी बौद्ध उपासक-उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.हा धम्मदेसना कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.



बीड: जयभिम महोत्सवात धम्मदेसना देतांना भिक्खु धम्मशिल थेरो, भिक्खु पय्यावर्धन आदी. ( छाया: प्रकाश वडमारे)

### यांनी केली धम्म याचना...

धम्मयाचना प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सदस्य वसंत तरकसे, भास्कर सरपते, जी.एन.भोले, डी. जी.वानखेडे, डी. एस.आठवले, यु.एस.वाघमारे, प्रा.अशोक गायकवाड, त्यानंतर त्रिरत्न, पंचशील ग्रहण करुन धम्मदेसना कार्यक्रमास सुरुवात झाली.

# महाबोधी बौद्ध विहार मुक्तीसाठी आंदोलन

## धोरण:उपस्थित राहण्याचे करण्यात आले आवाहन



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध महाविवार मुक्तीसाठी एकदिवसीय धरणे आंदोलन केलं जाणार आहे.सदरील धरणे आंदोलन बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज शनिवार (दि.५) रोजी सकाळी ११ ते ५ यावेळेत होणार आहे.या आंदोलनास उपस्थित राहण्याचे आवाहन आंबेडकरी जनतेने केले आहे.

प्रियदर्शी राजा चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंती निमित्ताने सकाळी ९:३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे अभिवादन करून, भव्य शांतता रॅली काढली जाणार आहे.ही रॅली बीड जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढली जाणार आहे. या रॅलीचे नेतृत्व भिक्खु » पान २ वर

# शेतकऱ्यांसाठी आनंदाची योजना

## धोरण:जिवंत सातबारा मोहीमे अंतर्गत योजना

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:महसूल विभाग - १०० दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत दिनांक ०१ मार्च २०२५ पासुन बीड जिल्हयातील सर्व गावांमध्ये जिवंत सातबारा मोहिम राबविण्यात येत असून सदर मोहिमेची शासनस्तरावर मा. महसूल मंत्री महोदय यांनी दखल घेवून सदर मोहिम संपुर्ण राज्यामध्ये राबविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.जिवंत सातबारा मोहिम अंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. या दृष्टीकानातुन संपूर्ण राज्यात जिवंत सातबारा मोहिम राबविण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला आहे.शासन निर्णय सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये अद्यावत करुन मयत खातेदारांच्या वारसाची नोंदींचे कामकाज पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिवंत सातबारा मोहिम राबविण्यास सुरुवात झाली आहे तरी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केज तलाठी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.संबंधित तहसिलदार यांची त्यांच्या तालुक्याकरीता समन्वय अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रात सदर कालबध्द कार्यक्रम वर नमूद विहीत मुदतीत पुर्ण करण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच » पान २ वर




# ...म्हणून समाजाची स्वाभिमानाने प्रगती

## मंत्री पंकजा मुंडे: विकास कामांचे भूमिपूजन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:'एकर विका, पण शिक्षण शिका' ही शिकवण राष्ट्रसंत भगवान बाबांनी दिली. या शिकवणीमुळेच समाज आज प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहे. आपण ऊस तोडणारे आहोत, कष्टाळू आहोत पण स्वाभिमानाने जगणारे आहोत. आजच्या तरूण पिढीने चुकीच्या गोष्टींच्या आहारी न जाता स्वतः ची प्रगती साधावी असा मोलाचा संदेश राज्याच्या पर्यावरण व महाराष्ट्र शासन पर्यटन संचलनालय मार्फत प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या कामाचे लोकार्पण आणि नवीन कामांचे भूमिपूजन ना. पंकजाताई मुंडे यांच्या मोठया उत्साहात संपन्न झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. प्रतिष्ठानचे डॉ. प्रभाकर धायतडक, आर टी गर्जे, डॉ. अमोल लहाने, डॉ शिवाजी सानप, शिवरूद्रानंद महाराज, योगेश क्षीरसागर, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.




प्रारंभी प्रतिष्ठानच्या वतीने विकास कामांना निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करून आभार मानण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते विकास कामांच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. पुढे बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करताना अतिशय आनंद होत आहे. संत भगवान बाबांना अभिप्रेत » पान २ वर

# एनएमएमएस परीक्षेत डॉ.सोनाजीराव रांजवण विद्यालयाचे १८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

पुण्यभूमी प्रतिनिधी

वडवणीः वडवणी येथील,कै. डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे १८ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील इयत्ता- ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले आहेत त्यांचा सिदंफना शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा.प्रतापभैय्या रांजवण साहेब यांच्या शुभहस्ते सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम शुक्रवार दि.४ एप्रिल २०२५ रोजी विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी बी.वाय.उजगरे साहेब उपस्थित होते.



याबाबत अधिक माहिती अशी की,एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत वडवणी तालुक्यातुन गुणवत्तेमध्ये सर्वप्रथम आल्या बद्दल कु. अनुष्का वैजेनाथ डीघे हिचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शाळेच नावलौकिक केल्याबद्दल सर्व विद्यार्थी व पालक यांचे अभिनंदन सचिव प्रतापभैय्या रांजवण साहेब यांनी केले व मुख्याध्यापक यशवंतराव भोसले सर यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने इयत्ता-८ वीसाठी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी एन.एम.एम. एस.शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते या परीक्षेचा निकाल नुकताच संकेतस्थळावर ऑनलाईन जाहीर झाला आहे. कै.डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एन.एम.एम. एस.२०२४-२५ शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १०९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर १८ विद्यार्थी » पान २ वर

# विनयभंग प्रकरणी एक वर्षे कठोर कारावास

पुण्यभूमी प्रतिनिधी

म्हसोबावाडी : महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीस एक वर्ष कारावास व चार हजार रुपये दंडाची शिक्षा आष्टी न्यायालयातील कोर्ट क्रमांक ४ न्यायाधीश मा. एम आर बडाख यांनी सुनावली.मंगेश अशोक गावडे असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की दि १०/२/२०२२ रोजी हा प्रकार घडला. पीडित महिला व तिची आई,मुलगा स्कुटी गाडी वर मिरजगाव वरून त्यांच्या गावाकडे जात असताना आरोपी मंगेश अशोक गावडे यांने मोटारसायकल वरुन शिवीगाळ व गाडीला कट मारतच होता. बोडखा येथील लक्ष्मीआई मंदीराजवळ त्याने पुन्हा गाडी आडवी घातली व मी माझी आई व माझा मुलगा आम्ही खाली पडलो माझ्या आईला मुक्का मार लागला व बाळ खाली पडले माझी स्कुटी गाडीला थोडे फ्रेंचस आले व थोडी फुटली आहे. आम्ही कसे बसे उठलो तेव्हा त्याला शांततेत विचारले तेव्हा तो माझ्या अंगावर धावून आला त्याने माझ्या हाताला धरुन ओढले व काई बाई बोलु लागला व लज्ञास्पद वर्तन केले मी सुटण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या तावडीतुन बाजुला नाही सुटू शकले तो पूर्ण दारु पिलेला होता त्याने माझी छेड काढली माझी आई मध्ये पडली तर तिच्या गळ्यातीळ मिनी डोरल ४ गैमचं तोडल आम्ही आरडा ओरडा केला तेव्हा तो पळून गेला व आता मला जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या होत्या » पान २ वर

# वरपगावच्या शेतकरी कन्येची यशोगाथा

## अभिनंदनिय:डॉ.माधुरी देशमुखांना पुरस्कार प्रदान!

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:महानगर- शेतकरी कन्येची यशोगाथा प्रा. डॉ. माधुरी देशमुख यांना 'एक्सलन्स इन रिसर्च अवॉर्ड' संशोधन आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या केज तालुक्यातील वरपगाव येथील उपसरपंच ड बाबुराव देशमुख यांच्या बहीणबाई . प्रा. डॉ. माधुरी देशमुख यांना आंतरराष्ट्रीय परिषदेत 'एक्सलन्स इन रिसर्च अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. हा प्रतिष्ठित सन्मान संजीवनी आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, कोपरगाव तसेच (रशिया), (कं बोडिया), (फिलिपिन्स), (तैवान) यांच्या सहकार्याने प्रदान करण्यात आला. वरपगावचे उपसरपंच ड बाबुराव देशमुख यांच्या बहीणाबाई यांनी संघर्षातून घडलेले यशस्वी शैक्षणिक प्रवास प्रा. डॉ. माधुरी देशमुख यांचा जन्म वरप गाव सारख्या खेड्यातील साध्या शेतकरी कुटुंबात झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाढत असताना त्यांनी शिक्षणाची कास धरली आणि कठोर परिश्रम, जिद्द व चिकाटीच्या जोरावर आज त्या डॉक्टरेट होऊन सहाय्यक प्राध्यापक या प्रतिष्ठित पदावर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांसाठी सामाजिक बांधिलकी आपल्या यशाच्या प्रवासात त्यांनी गरजू आणि आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सातत्याने मदत केली आहे. शिक्षण हा केवळ वैयक्तिक प्रगतीचा मार्ग » पान २ वर




**आ.निलेश लंके** | **वाघीण पुस्तकाचे प्रकाशन**

# नवोदित लेखकास शक्य तेवढी मदत

पुण्यभुमी प्रतिनिधी

नगर:ग्रामीण भागातील नवोदित लेखकास शक्य तेवढी मदत करणार असल्याचे प्रतिपादन आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांनी केले. ते शिरसगाव येथे झालेल्या विश्वनाथ शिंदे यांच्या वाघीण या इंग्रजी-मराठी संभाषण पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

पुस्तकाचे प्रकाशन गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड आणि माजी कुलगुरू डॉ. अशोक ढगे यांच्या हस्ते करण्यात आले आ.लंघे पुढे म्हणाले की, विश्वनाथ शिंदे हे प्रगतशील शेतकरी आहेत. ते क्रिकेटचे अष्टपैलू खेळाडू सारखे आहेत. ते राजकारण ,समाजकारण, अर्थकारण , बागायती अशा कोणत्याही क्षेत्रात चौकोनी हिऱ्याप्रमाणे आहेत.आता त्यांनी लेखन क्षेत्रातही दमदार पाऊल टाकले आहे. यावेळी रिपाइंचे सुनील वाघमारे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रजीला वाघिणीचे दूध म्हटले. त्याचाच संदर्भ देत लेखक विश्वनाथ शिंदे पाटील यांनी पुस्तकाचे नाव वाघिणदिले. असल्याचा संदर्भ दिला. साहित्यिक सत्येंद्र तेलतुंबडे यांनी लेखकाची पार्श्वभूमी विषद केली. इंग्रजी मध्ये कच्चे असल्याने लेखक विश्वनाथ शिंदे यांना नववीतून शाळा सोडावी लागली. अशी वेळ कोणावरही येऊ नये म्हणून त्यांनी आपल्या नात आणि नातवाच्या मदतीने प्रयत्नातून इंग्रजीवर मात केली. त्याचेच फलित म्हणून चौथी पाचवीच्या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरणारे हे पुस्तक स्वतः लिहून स्वतःच प्रकाशित केले.



# महापुरुष वकृत्व स्पर्धांचे आयोजन

## जयभिम महोत्सव: विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहरात सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने महापुरुष वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदरील स्पर्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सोमवार (दि.७) रोजी सकाळी ११ ते ५ यावेळेत आयोजित करण्यात आली आहे.या स्पर्धेत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.




महापुरुष वक्तृत्व स्पर्धेत युगपुरुष-महाराजा सयाजी गायकवाड किंवा राजर्षी शाहू महाराज, राष्ट्रपिता क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले, संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, त्यागमूर्ती माता सावित्रीबाई किंवा माता रमाई यांच्याविषयी प्रश्न विचारले जाणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, इयत्ता ६ वी ते ८ वी कोणतेही शुल्क नाही. मात्र इयत्ता ९ वी ते १० वी पन्नास रुपये शुल्क, खुला गट ११वी च्या पुढे शंभर रुपये शुल्क आकारले आहेत. महापुरुष वकृत्व स्पर्धेसाठी आपले नाव नोंदविण्यासाठी प्रा.बाळासाहेब गव्हाणे ९८६०४५०२०१, सुमेध जोगदंड ९४२२३३२२९५, प्रा.अशोक गायकवाड ९७६६९०३९०१, » पान २ वर